सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

सेतू-अभ्यास

Bridge-Course

इयत्ता - सातवी

विषय-मराठी

(द्वितीय भाषा)

सुलभभारती

शैक्षणिक वर्ष २०२१-२२



ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र , पुणे.

सेतू अभ्यास (ब्रिज कोर्स) : इयत्ता सातवी (द्वितीय भाषा)

- **प्रवर्तक** : शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन
- **प्रकाशक** : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **प्रेरणा** : **मा. वंदना कृष्णा**, (भा.प्र.से.)
  अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
- **मार्गदर्शक** : **मा.विशाल सोळंकी**, (भा.प्र.से.)
  आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  मा.राहुल द्विवेदी(भा.प्र.से.)
  राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
- **संपादक** : **मा. दिनकर टेमकर**
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **सहसंपादक** : **डॉ.विलास पाटील**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी संपादक** : **डॉ. कमलादेवी आवटे,** उपसंचालक (भाषा व समता विभाग)
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  नीता जाधव, उपविभागप्रमुख तथा अधिव्याख्याता, मराठी विभाग
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **संपादन सहाय्य** : **डॉ. नंदा भोर, अश्विनी नरवणे,** विषय सहायक, मराठी विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **निर्मिती गट समन्वयक** : **श्रीम. ज्योती विजय निंबाळकर,** अधिव्याख्याता (गट समन्वयक),
  जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,रत्नागिरी.
- **निर्मिती सदस्य** : १)**श्रीम. निशा अजय काजवे,** विषय सहायक,
  जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,कोल्हापूर.
  २)**श्रीम. पुर्वा देवेकर**, सहायक शिक्षक,
  श्री वसंतराव चौगुले इंग्लिश मिडीयम स्कूल, कोल्हापूर.
  ३) **श्रीम. सुप्रिया आगवणे,** सहायक शिक्षक,
  जि.प.प्रा.शाळा, रेडणी, ता. इंदापूर,जि.पुणे
  ४) **श्रीम. निता घोरपडे,** विषय सहायक,
  मॉडर्न इंग्लिश मिडीयम स्कूल. शिवाजीनगर, पुणे-५
  ५) **श्री सुनील भडके,** सहायक शिक्षक,
  ज्ञानेश्वर विद्यालय, बेगमपुरा, औरंगाबाद
  ६) **श्रीम. अरूणा उदावंत,** सहायक शिक्षक,
  जि.प.मराठी शाळा, राजूरी, पाचोरा, जळगाव.

शिक्षक / पालकांसाठी सूचना

कोविड 19 च्या उद्भवलेल्या परिस्थितीमुळे मागील शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष विद्यार्थी समोर असताना वर्ग अध्यापन होऊ शकले नाही. नव्या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष शाळा कधी सुरू होतील याबाबत अनिश्चितता आहे. मागील शैक्षणिक वर्षात आपण ऑनलाइन माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचवण्यासाठी विविध प्रयत्न केलेत. **मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांनी केलेल्या अध्ययनाची उजळणी व्हावी तसेच नवीन शैक्षणिक वर्षात शिकाव्या लागणाऱ्या अभ्यासक्रमाची पूर्वतयारी हा दुहेरी उद्देश ठेवून हा सेतू अभ्यास तयार करण्यात आला आहे.**

- सेतू अभ्यास एकूण ४५ दिवसांचा असून त्यात ठराविक कालावधीनंतर घ्यावयाच्या एकूण तीन चाचण्यांचा समावेश आहे.
- सेतू अभ्यास हा मागील इयत्तेच्या पाठ्यक्रमावर आधारित असून मागील इयत्तेचा पाठ्यक्रम व सध्याच्या इयत्तेचा पाठ्यक्रम यांना जोडणारा दुवा आहे.
- सदर अभ्यास हा इयत्तानिहाय व विषयनिहाय तयार करण्यात आला असून तो मागील इयत्तेच्या पाठ्यपुस्तकाशी संलग्न व त्यातील घटकांवर आधारित आहे.
- सदर सेतूअभ्यासात क्षेत्र, कौशल्य, संकल्पना व अध्ययन निष्पत्ती/क्षमता विधाने यांचा समावेश केला आहे.विद्यार्थ्यांना नेमके काय मार्गदर्शन करायचे आहे यासाठी मदत होईल.
- संकल्पनाप्रमाणे 'जाणून घेऊ या' मध्ये संबंधित संकल्पनेबाबत विद्यार्थ्याचे पूर्वज्ञान जाणून घेण्यासाठी, 'जाणून घेऊ या' मधील संकल्पनेबाबत त्याने अधिक सक्षम व्हावे यासाठी **'सक्षम बनू या'** मिळालेल्या माहितीचे किती आकलन झाले यासाठी **'सराव करू या'** व सराव करू यामध्येछ मिळालेल्या माहितीच्या आधारे विद्यार्थ्याने आधी चिकित्सक विचार करावा,सर्जनशील व्हावे,अर्थात उच्च बोधात्मक क्षमतांच्या विकासासाठी **काही कृतींचा समावेश केला आहे.**या सदरांचा समावेश केला आहे. .
- संकल्पना अधिक चांगल्या रीतीने समजून घेण्यासाठी मदत हवी म्हणून दीक्षा ॲप, क्यु आर कोड इ.ची मदत घ्यावी.
- शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्यांकडून सदरचा सेतू अभ्यास दिवसनिहाय नियोजनाप्रमाणे पूर्ण करून घ्यावा.
- चला सराव करू या हे सदर विद्यार्थी स्वप्रयत्नाने सोडवेल याकडे शिक्षकांनी लक्ष द्यावे, आवश्यक तेथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.
- निश्चित केलेल्या कालावधीनंतर घ्यावयाच्या चाचण्या विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्याव्यात, चाचण्या तपासून विद्यार्थीनिहाय गुणांची नोंद स्वतःकडे ठेवावी.
- चाचणी तपासताना विद्यार्थीनिहाय विश्लेषण करून मागे पडलेल्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त पूरक मदत करावी.

मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थी नेमके काय शिकले हे समजण्यासाठी, त्याची चाचपणी करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना पुढील इयत्तेतील संकल्पना समजून घेण्यासाठी व अध्ययनासाठी हा सेतू अभ्यास अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

विद्यार्थ्यांशी हितगुज

विद्यार्थी मित्रांनो,

मागील शैक्षणिक वर्षात तुम्ही ऑनलाइन व इतर विविध मार्गाने तुमचं शिक्षण सुरू ठेवलंत. तुमच खूप खूप कौतुक. या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला काही दिवस आपणाला मागील इयत्तेच्या पाठ्यक्रमाची उजळणी व्हावी आणि या वर्षीच्या इयत्तेच्या अभ्यासासाठी आपली पूर्वतयारी व्हावी, ही पूर्वतयारी करणे सोयीचे व्हावे,हा सेतू अभ्यास तयार करण्यात आला आहे.मागील शैक्षणिक वर्षात तुम्ही नेमके काय शिकला हे समजण्यासाठी आणि पुढील इयत्तेचा पाठ्यक्रम समजून घेण्यासाठी हा सेतू अभ्यास तुम्हाला मदत करणार आहे. त्यासाठी तुम्ही काय करायचे? एकूण ४५ दिवसाचा हा अभ्यास तुमच्यातील भाषिक कौशल्ये विकसित होण्याच्या दृष्टीने तयार करण्यात आला आहे. त्यासाठी प्रत्येक दिवशी दिलेला भागाचा अभ्यास करून त्यामध्ये दिलेल्या कृतींच्या उत्तरांचे लेखन तुमच्या वहीत करावयाचे आहे. यात दिवसनिहाय तयार केलेल्या कृतींचा समावेश आहे. दिलेल्या नियोजनाप्रमाणे कृती स्वप्रयत्नाने सोडवाव्यात. कृती सोडवताना अडचण आल्यास शिक्षक किंवा पालकांची मदत घ्या. जाणून घेऊ या, सक्षम बनू या,सराव करू या संबोधाने तुमच्याशी प्रत्यक्ष शक्य नाही तरी अप्रत्यक्ष संवाद साधायचा प्रयत्न केला आहे. जाणून घेऊ या मध्ये असलेल्या कृती सहज सोडवता येतील अशा आहेत,तसेच सक्षम बनू या मधील आशय समजून घेताना व कृती सोडवताना तुम्ही आपल्या पालकांची किंवा शिक्षकांचे मार्गदर्शन घ्या.सराव करू या मधील कृती मात्र स्वप्रयत्नाने सोडवा. तुम्ही चौदा दिवस या सेतूचा अभ्यास केल्यानंतर पंधराव्या दिवशी तुम्हाला एक चाचणी दिली आहे. ती सोडवून आपल्या शिक्षकांकडून तपासून घ्या.याप्रमाणे तिसाव्या दिवशी आणि शेवटी पंचेचाळीसाव्या दिवशी अशा तीन चाचण्या सोडवायच्या आहेत. दिलेल्या नियोजनानुसार येणाऱ्या चाचण्या सोडवा व उत्तरांची खात्री आपल्या शिक्षकांकडून करून घ्या.

हा सेतू अभ्यास यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा !

अनुक्रमणिका

क्रमांक	दिवस	क्षेत्र	पान नं.
१	पहिला	श्रवण	६
२	दुसरा	श्रवण	७
३	तिसरा	वाचन	८
४	चौथा	लेखन	९
५	पाचवा	भाषाभ्यास	१०
६	सहावा	श्रवण	११
७	सातवा	वाचन	१२
८	आठवा	लेखन	१३
९	नववा	भाषाभ्यास	१४
१०	दहावा	श्रवण	१५
११	अकरावा	वाचन	१६
१२	बारावा	लेखन	१७
१३	तेरावा	भाषाभ्यास	१८
१४	चौदावा	भाषण / संभाषण	१९
१५	पंधरावा	चाचणी -१- गुण – १५	२०
१६	सोळावा	वाचन	२१
१७	सतरावा	लेखन	२२
१८	अठरावा	भाषाभ्यास	२३
१९	एकोणिसावा	भाषण / संभाषण	२४
२०	विसावा	वाचन	२५
२१	एकविसावा	लेखन	२६
२२	बाविसावा	भाषाभ्यास	२७
२३	तेविसावा	भाषण / संभाषण	२८
२४	चोविसावा	वाचन	२९
२५	पंचविसावा	लेखन	३०
२६	सव्विसावा	भाषाभ्यास	३१
२७	सत्ताविसावा	भाषण / संभाषण	३२
२८	अट्ठाविसावा	वाचन	३४
२९	एकोणतिसावा	लेखन	३५
३०	तिसावा	चाचणी – २ – गुण -१५	३६
३१	एकतिसावा	भाषाभ्यास	३७
३२	बत्तिसावा	भाषण / संभाषण	३८
३३	तेहतिसावा	वाचन	३९
३४	चौतिसावा	लेखन	४०
३५	पस्तिसावा	भाषाभ्यास	४१
३६	छत्तिसावा	भाषण / संभाषण	४२
३७	सदतिसावा	लेखन	४२
३८	अडतिसावा	वाचन	४४
३९	एकोणचाळीसावा	वाचन	४५
४०	चाळीसावा	लेखन	५६
४१	एक्केचाळीसावा	लेखन	४७
४२	बेचाळीसावा	भाषाभ्यास	४८
४३	त्रेचाळीसावा	भाषाभ्यास	४९
४४	चव्वेचाळीसावा	वाचन	५०
४५	पंचेचाळीसावा	चाचणी – ३ – गुण ३०	५१

दिवस १

क्षेत्र - श्रवण, भाषण –संभाषण
संकल्पना - विविध साहित्यप्रकारांचे लक्षपूर्वक श्रवण

अध्ययन निष्पत्ती -

६ वी- पाठ्यविषय (पाठ, कविता, विनोद, गाणी इत्यादी) लक्षपूर्वक ऐकून त्याचा आनंद घेतात. त्याच्या ध्वनिफिती लक्षपूर्वक ऐकतात.

७ वी- पाठ्यविषय (पाठ, कविता, विनोद, गाणी इत्यादी) लक्षपूर्वक ऐकून त्याचा आनंद घेतात. त्याच्या ध्वनिफिती लक्षपूर्वक ऐकतात.

जाणून घेऊ या -

❖ शिक्षकांनी **हे खरे व्हावे** ही कविता विद्यार्थ्यांना ध्वनिफितीवर ऐकवावी. शिक्षकांनी व मुलांनी एकत्रित म्हणावी. शक्य असेल तर साभिनय कविता म्हणून घ्यावी.

सक्षम बनू या

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे गट करावेत . पठित गाणी व कविता यांच्या चिठ्ठ्या कराव्यात. प्रत्येक गटाला एक चिठ्ठी उचलण्यास सांगावी. चिठ्ठी मधील कविता/ गाणे याचे गट सादरीकरण करण्यास सांगावे. इतर विद्यार्थ्यांना लक्षपूर्वक ऐकण्यास सांगावे.

❖ इंटरनेटवर / दीक्षा ॲपवर उपलब्ध आनंददायी गाणी / कविता मुलांना दाखवावी, ऐकवावी व म्हणून घ्यावी.

सराव करू या -

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गटात / वैयक्तिक एका विनोदाचे, गाण्याचे सादरीकरण करून घ्यावे. शक्य असेल तर एखादे वाद्य ठेक्यासाठी वापरावे. विद्यार्थी लक्षपूर्वक ऐकतात का ते शिक्षकांनी पाहावे.

❖ पुढील शब्द असलेली कविता किंवा गाणे ओळख व म्हणून दाखव. इतर विद्यार्थी लक्षपूर्वक ऐकतील हे शिक्षकांनी पाहावे.

१. **कडकड** **गारा** **गिल्ला**

२. **जिव्हाळा** **कहाणी** **गप्पिष्ट**

दिवस २

क्षेत्र - श्रवण, भाषण, संभाषण
संकल्पना - आरोह - अवरोह

अध्ययन निष्पत्ती -

६ वी - पाठ्यविषयक (पाठ, कविता, विनोद, गाणी) लक्षपूर्वक ऐकून त्यांचा आनंद घेतात. त्यांच्या ध्वनिफिती समजपूर्वक ऐकतात.

७ वी - कविता, गाणी अभिनयासह व योग्य आरोह - अवरोहासह आनंददायी पद्धतीने म्हणतात.

जाणून घेऊ या -

❖ शिक्षकांनी एक नवीन कविता अभिनयासह व योग्य आरोह-अवरोहासह विद्यार्थ्यांना म्हणून दाखवावी.

❖ शिक्षकांनी कवितेतून उमगलेल्या अर्थावरून कवितेला नवीन शीर्षक द्यायला सांगावे व त्याच कवितेचे विद्यार्थ्यांकडून वैयक्तिक सादरीकरण घ्यावे.

सक्षम बनू या



२. गोरि गोरि पान

गोरि गोरि पान, फुलासारखी छान
दादा मला एक वहिनी आण ।।
गोऱ्या गोऱ्या वहिनीला, अंधाराची साडी
अंधाराच्या साडीला, चांदण्यांची खडी
चांदण्यांच्या खडीला, बिजलीचा वाण ।।
वहिनीला आणायला, चांदोबाची गाडी
चांदोबाच्या गाडीला, हरणांची जोडी
हरणांची जोडी तुडवी, गुलाबाचे रान ।।
वहिनीशी गट्टी होता, तुला दोन थापा
तुला दोन थापा, तिला साखरेचा पापा
बाहुल्यांशी खेळताना, दोघे आम्ही सान ।।

❖ शिक्षकांनी वरील चित्रातील गाण्याच्या अर्थाबाबतीत विद्यार्थ्यांची मते जाणून घ्यावीत.

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना देशभक्तीपर गीत आरोह-अवरोहासह म्हणायला सांगावे.

सराव करू या -

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या कविता व गाण्यांना चाली लावण्याच्या स्पर्धा घ्याव्यात.

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना 'पाऊस' या विषयावर कविता तयार करून त्याचे गटवार सादरीकरण करण्यास सांगावे.

दिवस ३

क्षेत्र - वाचन
संकल्पना - समजपूर्वक विनोदाचे वाचन

अध्ययन निष्पत्ती-

६ वी - विनोद वाचून त्याचा आनंद घेतात.
७ वी - विनोद वाचून त्याचा आनंद घेतात.

जाणून घेऊ या -

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना भाषेचे वाचन सुलभ व आनंददायी व्हावे या उद्देशातून खालील संवाद वाचण्यास सांगावा.



❖ विद्यार्थ्यांनी वाचलेल्या विनोदी उता-याचे खालील कृतीतून आकलन व स्वमत तयार होते का ते बघावे. त्यासाठी खालील कृती द्याव्यात व कृती वाचून विद्यार्थ्यांना उत्तरे देण्यासाठी प्रोत्साहित करावे.

१. वरील संवाद कोणत्या दोन व्यक्तींमध्ये झाला ?
२. वरील संवाद कोणत्या विषयावर आधारित आहे ?
३. वरील संवादातील खेळांची नावे सांगा.
४. तब्येत चांगली राहण्यासाठी काय केले पाहिजे, असे तुम्हाला वाटते?
५. वरील संवादात डॉक्टरांच्या ठिकाणी तुम्ही असता तर काय केले असते?

वरील कृतींची उत्तरे शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून मौखिक स्वरूपात घ्यावीत. उत्तरे सांगताना उत्तराच्या वाक्य रचनेसंदर्भात व स्वमतासंदर्भात सुयोग्य सूचना द्याव्यात.

सक्षम बनू या -

एक वेडा गाढवावर बसून जात असतो. दुसरा वेडा त्याला थांबवतो अन् विचारतो, "अरे , हेल्मेट का नाही घातलंस?"

तेव्हा पहिला वेडा म्हणतो , "अरे , नीट बघ ना खाली. फोर व्हिलर आहे फोर व्हिलर !"

सराव करू या -

वरील संवाद वाचून खालील प्रश्नांची तोंडी उत्तरे द्या.

१.वरील संवादातील वस्तूचे नाव सांगा?
२.वरील संवादात कोणत्या प्राण्याचा उल्लेख आलेला आहे ?
३.वरील संवादातून वाहतुकीच्या कोणत्या नियमाची माहिती आपणास मिळते?

दिवस ४


क्षेत्र - लेखन
संकल्पना - हस्ताक्षर लेखन

अध्ययन निष्पत्ती-

६ वी - लेखन करताना दोन शब्दांत योग्य अंतर ठेवतात.

७ वी - लेखन करताना दोन शब्दांत योग्य अंतर ठेवतात.

जाणून घेऊ या -


पाणी एवढं चवदार का वाटलं असावं?
विचार केल्यावर कळलं, पाण्यात औरसचौरस होताच, पण
त्यात माझी तहानही मिसळली होती. पाण्याला चव आली
होती ती माझ्या तहानेमुळे!
गोष्ट तीच असते. पण त्यात आपली उत्सुकता
उत्सुकता किती मिसळते, त्यावर त्याची चव ठरत असावी.
खूप गोष्टी सहजपणे आणि विपुलतेने मिळाल्या की त्यातली
चव निघून जाते. लायब्ररीच्या शेजारीच राहणारा पुस्तकांचे
एक पानही न उलगडणारा असू शकतो; पण रानावनातला
तुकतुकीच्या चार इयत्ता पुढे गेलेला शुराच्याचा पोर
रद्दीतला कागद तडफडून वाचतो, त्याचे डोळे चमकतात.
आपल्या मुलांना नव्या कपड्यांचा दोष जाणून घ्या. ती

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सुंदर हस्ताक्षराचा नमुना दाखवावा . दोन शब्दात ,दोन अक्षरांत कसे अंतर ठेवावे याची माहिती द्यावी . विद्यार्थ्यांकडून एक उतारा प्रत्यक्ष उपस्थितीत शिक्षकांनी लिहून घ्यावा. त्यांनी लिहिलेला उतारा तपासून त्यांना मार्गदर्शन करावे.

सक्षम बनू या -

❖ शिक्षकांनी पाठ्यपुस्तकातील एक उतारा निवडून विद्यार्थ्यांना पाहून वळणदार अक्षरात लिहिण्यास सांगावे . शिक्षकांनी विद्यार्थ्यांना छोट्या छोट्या गोष्टी, थोर व्यक्तींच्या विचारांची पुस्तके देऊन विद्यार्थ्यांकडून उतारे लिहून घ्यावेत . लिहिलेला उतारा तपासून उतारा फळ्यावर लिहून विद्यार्थ्याला चुकलेले शब्द शोधून पुन्हा लिहिण्यास सांगावे.

सराव करू या -

❖ बाजारातील दुकानांचे बोर्ड, गाड्यांवरचे बोर्ड वाचावेत, लिहून घ्यावेत ते अचूक आहेत का शिक्षकांकडून तपासून सुंदर अक्षरात लिहून काढावेत.

❖ वर्तमानपत्रे, मासिके यामधील उतारे पाहून लिहिण्याचा सराव करावा .

दिवस ५

क्षेत्र - भाषाभ्यास
संकल्पना - शब्दांच्या जाती (नाम , सर्वनाम)

अध्ययन निष्पत्ती-

६ वी - विद्यार्थी व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा योग्य वापर करतात. (नाम, सर्वनाम)

जाणून घेऊ या -

छत्री, समोरून, मिळाला, टुकुटुकु --- छत्री
वादळामुळे, छान , शाळा, अय्या --- शाळा
नवीन, तुला, मिळेल --- तुला
फळ, मधुर, ते, आहे --- ते

(वरीलप्रमाणे उदाहरणे देऊन शिक्षकांनी दिलेल्या गटातील नाम व सर्वनाम ओळखून विद्यार्थ्यांना या शब्दांच्या जातींची ओळख करून द्यावी).

❖ शिक्षकांनी खालील उताऱ्यातील नामे व सर्वनामे अधोरेखित करून विद्यार्थ्यांना संकल्पना स्पष्ट करावी.

त्यांचा संसार छान चालला होता. अचानक त्यांना वाटू लागले की कॉलेजचा राजीनामा देऊन सर्व वेळ आश्रमाचेच काम करावे. त्यांनी निर्णय घेतला. समाजकार्य सुरू केले.

सक्षम बनू या -

❖ शिक्षकांनी वरीलप्रमाणे गट व उतारे देऊन नाम, सर्वनाम यांचे वर्गीकरण करण्याची कृती विद्यार्थ्यांना द्यावी.


सराव करू



वरील चित्रातील नामे ओळखून विद्यार्थ्यांनी त्याची यादी करावी.

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना त्यांना माहीत असलेली सर्वनामे खालील आकृतीबंधामध्ये लिहायला सांगावी.

सर्वनामे



दिवस ६

क्षेत्र - श्रवण, संभाषण
संकल्पना - संदेशवहन

अध्ययन निष्पत्ती -

६ वी - भिन्न वेळी भिन्न विषयासंबंधी इतरांनी सांगितलेल्या गोष्टी समजून घेतात. स्वत:च्या भाषेत सांगतात.

७ वी - घरी व परिसरात घडणारे अनौपचारिक संभाषण समजपूर्वक ऐकतात.

जाणून घेऊ या -



- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील चित्राचे निरीक्षण करायला सांगून प्रश्नांद्वारे संदेशवहनाच्या साधनांची माहिती द्यावी.
- शिक्षकांनी सध्या वापरत असलेल्या संदेशवहन साधनांबाबात व विद्यार्थ्यांची गट चर्चा घडवून आणावी.

सक्षम बनू या -

- शिक्षकांनी पोस्टकार्ड, वर्तमानपत्र, मोबाईल, कंम्प्युटर या संदर्भात विद्यार्थ्यांना विविध प्रश्न विचारून प्रसंगी माहिती समजावून सांगावी.
- शिक्षकांनी ऑनलाईन बँकिंगच्या संदर्भात विद्यार्थ्यांना गट चर्चा करण्यास सांगावी.

सराव करू या -

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वृत्तपत्राच्या माध्यमातून कोणत्या प्रकारच्या बातम्या समजतात, यावर चर्चा करण्यास सांगावी.
- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना कुरिअर, स्पीडपोस्ट, पार्सल यांची इंटरनेटच्या माध्यमातून माहिती द्यावी व मिळालेल्या माहितीची शिक्षकांनी प्रश्नांद्वारे चाचपणी घ्यावी.

दिवस ७

क्षेत्र - वाचन
संकल्पना -समजपूर्वक वाचन

अध्ययन निष्पत्ती -

६ वी सार्वजनिक ठिकाणच्या सूचना समजपूर्वक वाचतात.

जाणून घेऊ या -

(शिक्षकांनी खालील सुविचार पट्ट्या व सूचनाफलक मुलांना निरीक्षण करून वाचावयास सांगावेत.)

सुविचार–

मन प्रसन्न असेल, तर कामात उत्साह येतो व काम झटपट होते.

मनापासून व एकाग्रतेने काम केले, की जीवनात यश हमखास मिळते.

चांगले पेराल तर चांगले उगवेल हे विसरता कामा नये, कारण ते जीवनाचे सूत्र आहे.

अधिक मित्र हवे असतील,तर दुस-यांच्या गुणांचे मनापासून कौतुक करा.

सूचनाफलक -

तिकिटाएवढेच पैसे वाहकास द्यावे, तिकीट मागून घ्यावे.

स्त्रिया व अपंग यांच्यासाठी राखीव ठेवलेल्या जागेवर बस् नये.

स्पीडब्रेकरकडे करू नका दुर्लक्ष, अपघात होऊ नये, म्हणून द्या सदैव लक्ष.

वाहन चालवताना मोबाईलचा वापर नेहमी टाळा.

❖ वाचन झाले की शिक्षकांनी मुलांना त्या प्रत्येक सुविचार व सूचनांची कृती काय करायची किंवा बोध काय ते विचारावे दिलेल्या उत्तरात गरज भासल्यास अधिकची जोड द्यावी ..

१.मन प्रसन्न असेल तर काय होते ?
२.स्पीड ब्रेकर कडे दुर्लक्ष का करू नये ?

सक्षम बनू या -

❖ वरील प्रकारचे अजून कोणकोणते सूचनाफलक आपल्याला सार्वजनिक ठिकाणी वाचावयास मिळतात याबाबत शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विचारावे व त्याचे फलक लेखन करून विद्यार्थ्यांना सूचना फलक वाचावयास सांगावेत.

सराव करू या -

❖ घरातून बाहेर जाताना सार्वजनिक ठिकाणी दिसणारे, वेगवेगळी दुकान, स्थळे, इमारती यावरील सूचनाफलक इत्यादींचे विद्यार्थ्यांनी वाचन करावे व तसे सूचना फलक शाळेत तयार करावेत. कार्डशिट किंवा पुठ्ठ्याच्या साहाय्याने शालेय परिसरात लावावेत व त्याचे नियमित वाचन करून त्याप्रमाणे कृती करावी.

दिवस ८

क्षेत्र – लेखन
संकल्पना -अनुलेखन

अध्ययन निष्पत्ती-

६ वी - परिच्छेदाचे अचूक अनुलेखन व श्रुतलेखन करतात.
७ वी - परिच्छेदाचे अचूक अनुलेखन व श्रुतलेखन करतात.

जाणून घेऊ या -

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील एक उतारा फळ्यावर लिहून दाखवावा ,विद्यार्थ्यांनी पाहून अचूक शब्दात लिहून घ्यावा . लिहून झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या कोणत्या चुका झाल्या आहेत त्यावर चर्चा करावी ,चुकलेल्या शब्दांचा सराव करण्यास सांगावा. शब्द चुकण्याची कारणे शोधण्यास सांगावे.

सक्षम बनू या -

❖ शिक्षकांनी पाठ्यपुस्तकातील एक उतारा निवडून विद्यार्थ्यांना पाहून वळणदार अक्षरात लिहिण्यास सांगावे . शिक्षकांनी विद्यार्थ्यांना छोट्या छोट्या गोष्टी,थोर व्यक्तींच्या विचारांची पुस्तके देऊन विद्यार्थ्यांकडून उतारे लिहून घ्यावेत . लिहिलेला उतारा तपासून तोच उतारा फळ्यावर लिहून विद्यार्थ्याला चुकलेले शब्द शोधून पुन्हा लिहिण्यास सांगावे.

सराव करू या -

❖ बाजारातील दुकानांचे बोर्ड,गाड्यांवरचे बोर्ड वाचावेत, लिहून घ्यावेत ते अचूक आहेत का हे शिक्षकांकडून तपासून सुंदर अक्षरात लिहून काढावेत.
❖ वर्तमानपत्रे,मासिके यामधील उतारे पाहून लिहिण्याचा सराव करावा .

दिवस ९

क्षेत्र -लेखन

संकल्पना -शब्दांच्या जाती (विशेषण)

अध्ययन निष्पत्ती-

६ वी - विद्यार्थी व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा योग्य वापर करतात. (विशेषण)

जाणून घेऊ या -



❖ शिक्षकांनी वरील निसर्गचित्र विद्यार्थ्यांना दाखवावे. चित्राचे वर्णन करून सांगावे. हिरवी झाडे, लाकडी होडी, काळे दगड, उंच झाडे, निळे पाणी अशा वर्णनातून 'विशेषण' संकल्पना विशद करावी.

सक्षम बन् या -

❖ शिक्षकांनी विशेषणाची व्याख्या तयार करण्यास विद्यार्थ्यांमध्ये चर्चा घडवून आणावी.

शिक्षकांनी कंसातील योग्य विशेषणे विद्यार्थ्यांकडून वाक्यात वापरून घ्यावीत.

१. नंदू ------ बुद्धीचा होता. (कुशाग्र, मेहनती, कष्टाळू)

२. लताबाईंचा आवाज ------- आहे. (कडू, गोड, तिखट)

३.देशभक्तांनी ------- भारतासाठी खूप कष्ट घेतले. (सुंदर, सुरेख, स्वतंत्र)

सराव करू या -

❖ १.विद्यार्थ्यांनी दिलेल्या विशेषणांचा वापर करून योग्य वाक्ये तयार करावी.

नाजूक, सोनेरी, कच्ची, चपळ, कौलारू, ताजा

२. हुतात्मा, काळी, चिंच, रूपेरी, वादळी, बादली, वारा, मुकुट, अमर, आंबट

वरील शब्दांचे नाम व विशेषण या तक्त्यामध्ये वर्गीकरण करा.

नाम	विशेषण

दिवस १०

क्षेत्र - श्रवण, भाषण –संभाषण
संकल्पना - स्व-अभिव्यक्ती

अध्ययन निष्पत्ती-

६ वी - रेडिओ, दूरदर्शन, वर्तमानपत्रे, इंटरनेट याद्वारे पाहिलेल्या, ऐकलेल्या घटना स्वतःच्या शब्दांत मांडतात.

७ वी- रेडिओ, दूरदर्शन, वर्तमानपत्रे, इंटरनेट याद्वारे पाहिलेल्या, ऐकलेल्या घटना स्वतःच्या शब्दांत मांडतात. तसेच यांचा वापर करून अधिकची माहिती मिळवतात.

जाणून घेऊ या -



टस्करचा धुमाकूळ

हाळोली, वेळवट्टी परिसरात पिकांसह टाकीची मोडतोड

हाळोली : येथील ऊस पिकाचे टस्करने केलेले नुकसान.

आजरा : पुढारी वृत्तसेवा

आजरा तालुक्याच्या पश्चिम भागात दोन टस्करांचा धुमाकूळ सुरूच आहे. ऊस, भात व नारळ पिकांची टस्करकडून मोठ्या प्रमाणावर नुकसान सुरू आहे. शेतामध्ये असणाऱ्या पाण्याची टाकी फोडून टस्करने नुकसान केले आहे.

हाळोली येथील संजय कृष्णा तावडे यांच्या ऊस व नारळ पिकांचे नुकसान केले आहे. वेळवट्टी येथील ललिता बसंतराव देसाई यांच्या नारळ व पाण्याची टाकी फोडून नुकसान केले आहे. देसाई यांच्या ऊस पिकावेही नुकसान केले आहे. सध्या पावसाने ओढ दिली असल्याने शेतकरी चिंतेत आहेत. त्यात टस्करकडून होणाऱ्या नुकसानीमुळे पुन्हा शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली असून टस्करचा बंदोबस्त करावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

❖ वर्तमानपत्रातील बातमीचे वाचन करून घेऊन त्या घटनेविषयी चर्चा करून घ्यावी.

❖ बातमीतील घटना विद्यार्थ्यांना त्यांच्या शब्दांत सांगण्यास सांगावी.

सक्षम बनू या -

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील प्रश्नांद्वारे बोलते करावे.

प्राण्यांसाठी टीव्हीचे कोणते चॅनल प्रसिद्ध आहे ? त्यावर तुम्ही पाहिलेला एक प्रसंग सांगा.

❖ (शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारावेत. विद्यार्थ्यांना स्वतःच्या शब्दांत उत्तर मांडण्यास सांगावे.) - रेडिओ, दूरदर्शन, वर्तमानपत्रे, इंटरनेट या चारही साधनांमध्ये कोणता फरक आहे?

सराव करू या -

❖ सोबत दिलेले चिन्ह कशाचे आहे ? त्याच्या मदतीने तू एखादी घटना/ गोष्ट पाहिली असल्यास ती तुझ्या शब्दांत सांग.

दिवस ११

क्षेत्र -वाचन
संकल्पना -समजपूर्वक वाचन

अध्ययन निष्पत्ती-

६ वी - सार्वजनिक ठिकाणच्या सूचना समजपूर्वक वाचता येणे
७ वी - सार्वजनिक ठिकाणच्या सूचना समजपूर्वक वाचता येणे.

जाणून घेऊ या -

❖ **खाली दिलेला सूचनाफलक शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वाचावयास सांगावा.**



(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील प्रश्न विचारणे.)

१) वरील सूचनेत काय सांगितले आहे ?

२) किल्ल्यांच्या संवर्धनासाठी आपण काय केले पाहिजे ?

सक्षम बनू या -

❖ शिक्षक विद्यार्थ्यांना अजून काही सूचना देतात की, तुम्हाला सार्वजनिक परिसरात सूचनाफलक आढळतात का? ते लिहा. विद्यार्थ्यांनी सांगितलेले नवीन सूचनाफलक फळ्यावर लिहावे व त्या लिहिलेल्या सूचनाफलकावर सर्व मिळून वाचन करून चर्चा करावी.

समर्थ नगर परिसरात पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईनच्या दुरुस्तीचे काम तातडीने सुरू करण्यात येणार आहे त्यामुळे उद्या आपल्या परिसरात पाणीपुरवठा बंद करण्यात येणार आहे समर्थनगर परिसरातील सर्व नागरिकांनी यांनी याची नोंद घ्यावी तसेच उपलब्ध पाण्याचा वापर जपून करावा.

सराव करू या -

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आपल्या आजूबाजूच्या परिसरात नियमित दिसणाऱ्या अशा सूचनाफलकांचे वाचन करून त्याचा अर्थ काय याचे स्पष्टीकरण लिहून त्याचे वाचन करून घ्यावे.

दिवस १२

क्षेत्र - लेखन
संकल्पना - श्रुतलेखन

अध्ययन निष्पत्ती-

६ वी - परिच्छेदाचे अचूक अनुलेखन व श्रुतलेखन करतात .
७ वी - परिच्छेदाचे अचूक अनुलेखन व श्रुतलेखन करतात .

जाणून घेऊ या -

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या जुलमी रूढीचा धिक्कार केला. 'चवदार तळे' सर्वांना खुले व्हावे, म्हणून त्यांनी महाड येथे सत्याग्रह केला. हजारो लोकांच्या उपस्थितीत २० मार्च १९२७ रोजी डॉ. आंबेडकरांनी स्वतः तळ्याचे पाणी पिऊन एक अन्यायी परंपरा संपवली. दलितांबरोबर सवर्ण सुधारक देखील या लढ्यात सहभागी झाले होते. अस्पृश्यता पाळणे, माणसांनी एकमेकांना हीन लेखणे अशा विषमतेच्या परंपरांना डॉ. आंबेडकरांनी संघटित विरोध केला. स्त्रियांना, दलितांना समतेने, समानतेने जगण्याचा हक्क मिळावा म्हणून त्यांनी आयुष्यभर अपार संघर्ष केला. 'चवदार तळे' ही जागा अशाच एका प्रसंगाची साक्षीदार आहे.

'चवदार तळ्याचा सत्याग्रह' ही घटना भारताच्या इतिहासातील एक प्रेरणादायी घटना मानली जाते.

❖ शिक्षकांनी वरील उतारा विद्यार्थ्यांना वाचून दाखवावा ,विद्यार्थ्यांना ऐकून लिहिण्यास सांगावे

सक्षम बनू या -

❖ शिक्षकांनी पाठ्यपुस्तकातील एक उतारा निवडून विद्यार्थ्यांना पाहून वळणदार अक्षरात लिहिण्यास सांगावे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना छोट्या छोट्या गोष्टी, थोर व्यक्तींचे विचार वाचून दाखवावेत. विद्यार्थ्यांकडून लिहून घ्यावेत. वाचलेला उतारा फळ्यावर लिहून विद्यार्थ्याला स्वतः लिहिलेला उतारा तपासण्यास सांगावे . चुकलेले शब्द शोधून पुन्हा लिहिण्यास सांगावे.

सराव करू या -

❖ विद्यार्थ्यांनी रेडिओ / टीव्ही वरील बातम्या ऐकून लिहिण्याचा सराव करावा .

❖ विद्यार्थ्यांनी इंटरनेटचा वापर करून गोष्टी ऐकाव्यात व लिहिण्याचा सराव करावा .

दिवस १३

क्षेत्र -भाषाभ्यास
संकल्पना -शब्दांच्या जाती (क्रियापद)

अध्ययन निष्पत्ती-

६ वी - विद्यार्थी व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा योग्य वापर करतात. (क्रियापद)

जाणून घेऊ या -


मुलगा **धावतो.**

मुलगी **खाते.**

पक्षी **उडतो.**

आजोबा वाचतात.

सक्षम बनू या -

- वरील चित्रांमधील अधोरेखित शब्द दाखवून शिक्षकांनी चित्रात कोणत्या क्रिया चालल्या आहेत त्या स्पष्ट कराव्यात. क्रिया दर्शवणाऱ्या शब्दांना 'क्रियापद' म्हणतात हे स्पष्ट करावे. 'क्रियापद' संकल्पना आकलनासाठी शिक्षकांनी फुलणे, चढणे, हसणे, सांगणे यासारखी उदाहरणे द्यावीत.
- बस – बसणे, चाल – चालणे, ऐक – ऐकणे , नाच – नाचणे ही व इतरही उदाहरणे देऊन शिक्षकांनी विद्यार्थ्यांना याप्रकारच्या जोड्या तयार करायला सांगाव्यात.

सराव करू या -


_____

_____

_____

_____

_____

_____

- वरील चित्रांसमोर कंसातील योग्य क्रियापद निवडून लिहा. (रडणे,बघणे, चालणे, बसणे, कापणे, तुटणे, ऐकणे, पळणे, लिहिणे, खेळणे) करावा, पळावे, गावे, उडवावे या क्रियापदांचा वापर करून योग्य वाक्ये तयार करा.

दिवस १४

क्षेत्र –भाषण- संभाषण
संकल्पना -प्रश्न विचारणे, मत मांडणे.

अध्ययन निष्पत्ती -

६ वी - रेडिओ, दूरदर्शन, वर्तमानपत्रे, इंटरनेट याद्वारे पाहिलेल्या, ऐकलेल्या घटना स्वत:च्या शब्दांत मांडतात तसेच यांचा वापर करून अधिकची माहिती मिळवतात.

७ वी - विविध प्रसारमाध्यमांद्वारे प्रसारित होणा-या बातम्या, चर्चा, संवाद समजपूर्वक ऐकतात.

जाणून घेऊ या -



❖ शिक्षकांनी वरील चित्रातील व्हिडीओ यु-ट्युबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दाखवावा व व्हिडीओवर आधारित माहितीवर प्रश्नांद्वारे चर्चा करण्यास सांगावी.

❖ भारतातील ऑलिंपिक खेळाडू व त्यांचा खेळ यांविषयी चर्चा करून विद्यार्थ्यांना माहिती द्यावी.

सक्षम बनू या -



❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील चित्राचे निरीक्षण करायला सांगून वर्तामानपत्रात छापण्यासाठी कोणती बातमी तयार करता येईल यावर चर्चा करण्यास सांगावे.

❖ रेडिओ, दूरदर्शन, वर्तमानपत्रे, इंटरनेट या चारही प्रसारमाध्यमांपैकी प्रभावी माध्यम कोणते ? यासंदर्भात अनुभव कथन करण्यास विद्यार्थ्यांना सांगावे.

सराव करू या -

(शिक्षकांनी खाली दिलेल्या उपक्रमामध्ये मुलांना सुविधा उपलब्ध करण्याबाबतीत साहाय्य करावे.)

❖ तुमच्या आवडत्या खेळाविषयी इंटरनेटच्या माध्यमातून माहिती घ्यावयाची असेल तर ती कशी घेणार ? किंवा दूरदर्शनवरील तुमच्या आवडत्या कार्यक्रमाविषयी मत द्या.

प्रश्न:१.खाली दिलेल्या उताऱ्याचे वाचन कर व प्रश्नांची उत्तरे लिही. **(५ गुण)**

अनेक खेडी, गावे आणि शहरे या सर्वांचा मिळून देश बनतो. देशाला निश्चित सीमारेषा असते. या सीमारेषेच्या आत राहणारे लोक त्या देशाचे रहिवासी असतात. भारताच्या सीमारेषेत राहणारे आपण सर्व भारतीय म्हणून ओळखले जातो.राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत व राजमुद्रा ही आपली राष्ट्रीय प्रतीके आहेत. आपल्या राष्ट्रध्वजात तीन रंग आहेत. ते तीनही रंग आपल्याला एक निश्चित संदेश देतात. 'जनगणमन' हे आपले राष्ट्रगीत आहे. त्यात भारतातील विविध प्रदेश, नद्या व पर्वत यांचे वर्णन केले आहे. राष्ट्रगीताचा आदर करणे हे आपले कर्तव्य आहे. सारनाथ येथील अशोक स्तंभाच्या आधारे भारताची राजमुद्रा तयार करण्यात आली आहे. राजमुद्रेतील सिंहाच्या चित्राखाली 'सत्यमेव जयते' हे वचन आहे. सर्व नाणी, नोटा, शासकीय पत्रे यांवर ही राजमुद्रा असते. राष्ट्राबद्दलचे प्रेम प्रतीकांमधून व्यक्त होते. राष्ट्रीय प्रतीकांमुळे एकात्मतेची भावना दृढ होते. भारतीयांमधील ऐक्यभावना देशाच्या प्रगतीला हातभार लावते.

(उतारा वाचनास – २ गुण द्यावेत. प्रत्येक प्रश्नाच्या अचूक उत्तरास १ गुण द्यावा.)

अ) राष्ट्रीय प्रतीकांमुळे एकात्मतेची भावना कशाप्रकारे दृढ होते ?

आ) राष्ट्रध्वजातील तीन रंग कोणता संदेश देतात?

इ) नदया, पर्वत, विविध प्रदेश यांचे वर्णन असणाऱ्या राष्ट्रगीतातील पंक्ती कोणत्या?

प्रश्न.२. खाली दिलेल्या कोणत्याही एका विषयावर पाच ओळी माहिती लिही. **(गुण-३)**


१) आवडता खेळ २)मी पंतप्रधान झालो तर

प्रश्न.३. खालील चित्राच्या समोर सामान्यनाम, विशेषनाम,भाववाचक नाम लिही. **(गुण-३)**

सामान्यनाम

विशेषनाम

भाववाचक नाम



प्रश्न.४. गाळलेल्या जागी योग्य सर्वनाम लिही. **(गुण-२)**

१) .....खाऊ मुलांना द्या.

२) ..... आकाश कंदील बनवते.

प्रश्न. ५.खालील चित्राचे तुझ्या शब्दात वर्णन कर. (किमान २ ओळी) **(गुण-२)**



दिवस १६

क्षेत्र - वाचन
संकल्पना - समजपूर्वक वाचन

अध्ययन निष्पत्ती -

६ वी - सार्वजनिक ठिकाणच्या सूचना समजपूर्वक वाचतात.
७ वी - सार्वजनिक ठिकाणच्या सूचना समजपूर्वक वाचतात.

जाणून घेऊ या -

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना काही सार्वजनिक वास्तूतील सूचनाफलकांचे फळ्यावर लेखन करून वाचावयास सांगावे. उदा: दवाखान्याच्या ठिकाणी लावलेल्या सूचना पाट्या वाचा.



सक्षम बनू या -

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरीलप्रमाणे दवाखान्यात लावलेल्या पाट्यांप्रमाणे जर शाळेत पाट्या लावायच्या असतील तर कोणत्या सूचनांच्या पाट्या तयार कराल असे विचारावे.विद्यार्थ्यांनी दिलेल्या उत्तरावरून फळ्यावर शाळेच्या पाट्या लिहून घ्याव्या व वाचावयास सांगावे.

सराव करू या -

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अशा सार्वजनिक संस्था, ठिकाणांची नावे सांगून त्याठिकाणी कोणकोणते सूचनाफलक लावलेले असतात ते प्रत्यक्ष बघून येण्यास सांगावे आणि त्यांच्या वहीत सूचनाफलक तयार करावे व त्याचा अर्थ समजण्यासाठी विद्यार्थ्यांकडून कृती करून घ्यावी.

उदा: धार्मिक स्थळे, आठवडी बाजार, तहसील कार्यालय, ग्रामपंचायत इ.

दिवस १७

क्षेत्र - लेखन
संकल्पना - स्व- अभिव्यक्ती लेखन

अध्ययन निष्पत्ती-

६ वी - चित्रवर्णन स्वतःच्या शब्दांत लिहितात.
७ वी - चित्र / प्रसंग वर्णन स्वतःच्या शब्दांत लिहितात.

जाणून घेऊ या -



❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे व त्याच्यावर विविध प्रश्न विचारावेत .उदा . चित्रामध्ये काय दिसते ?कोणती समस्यां दिसून येते ? इ.

सक्षम बनू या -

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध चित्रे दाखवावीत व विद्यार्थ्यांकडून स्वभाषेत त्याचे वर्णन लिहून घेण्यास मदत करावी. लिहिलेले प्रत्येक विद्यार्थ्याचे वर्णन वर्गात वाचून घेऊन त्यामध्ये दुरुस्ती करावी. उदा . महापुराचे चित्र, वायूप्रदूषण चित्र इ.

सराव करू या -

❖ विद्यार्थ्यांनी विविध चित्रे जमवावीत त्याच्यावर मित्राशी चर्चा करावी आणि चित्राविषयी माहिती लिहिण्याचा सराव करावा .

❖ विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकातील चित्रावर मित्रांना प्रश्न विचारावेत, त्याने सांगितलेले वर्णन स्वभाषेत लिहावे .

दिवस १८

क्षेत्र - भाषाभ्यास
संकल्पना - लिंग, वचन

अध्ययन निष्पत्ती -

६ वी - विद्यार्थी व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा योग्य वापर करतात. (लिंग, वचन)

जाणून घेऊ या -

तो अंधार दाट आहे ➡ तो ➡ पुल्लिंग
ती रात्र काळोखी आहे. ➡ ती ➡ स्त्रीलिंग
ते चांदणे शीतल आहे. ➡ ते ➡ नपुसकलिंग

वरील उदाहरणांद्वारे शिक्षकांनी पुल्लिंग, स्त्रीलिंग व नपुसकलिंग या लिंग संकल्पना विद्यार्थ्यांना समजावून सांगाव्यात.



एक फूल



अनेक फुले

❖ वरील चित्रांखाली अधोरेखित केलेल्या एक व अनेक या शब्दांमधून एकवचन व अनेकवचन या संकल्पना शिक्षकांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगाव्यात.

सक्षम बनू या -

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना भिन्नलिंगी शब्द लिहिण्यास प्रवृत्त करावे जसे की ,
आजी – आजोबा, मोर – लांडोर, चिमणा – चिमणी, गाय – बैल

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना भिन्नवचनी शब्द लिहिण्यास प्रवृत्त करावे जसे की ,
आंबा – आंबे , गोष्ट – गोष्टी , नदी – नद्या , मोळी – मोळ्या
'एकवचनी व अनेकवचनी रुपे सारखीच असणारी नामे' ही संकल्पना शिक्षक स्पष्ट करतात. तशी नामे विद्यार्थ्यांना वर्गात सांगावयास सांगतात जसे की ---- दगड – दगड , देश – देश

सराव करू या -



१. चित्रातील प्रत्येकी ४ स्त्रीलिंगी, पुल्लिंगी, नपुसकलिंगी शब्द लिहा.
२. खालील अधोरेखित नामांची भिन्नवचनी रूपे लिहून वाक्ये पुन्हा लिहा.

* मोर पावसात ओरडतो .
* समई तेवत आहे.
* यंत्र दुरुस्त झाले.

दिवस १९

क्षेत्र - श्रवण, भाषण –संभाषण
संकल्पना - प्रश्न विचारणे, मत मांडणे.

अध्ययन निष्पत्ती -

६ वी - पाहिलेल्या व ऐकलेल्या घटना (उदा. स्थानिक, सामाजिक घटना, कार्यक्रम) यांविषयी न अडखळता बोलतात, प्रश्न विचारतात, मत मांडतात .

७ वी - पाहिलेल्या व ऐकलेल्या घटना (उदा. स्थानिक, सामाजिक घटना, कार्यक्रम) यांविषयी न अडखळता बोलतात, प्रश्न विचारतात, मत मांडतात .

जाणून घेऊ या -



पेट्रोल दराने ओलांडली शंभरी

नवी दिल्ली : देशातील अनेक शहरांसह आता राजधानी दिल्लीतही पेट्रोल दराने प्रतिलिटर १०० रुपयांच्याही पुढे झेप घेतली आहे. बुधवारी डिझेलच्या किमतीत १३ ते १८ पैसे वाढ झाली, तर पेट्रोल दरात प्रतिलिटरमागे ३३ ते ३५ पैसे वाढ झाली. या वाढीनंतर दिल्लीत पेट्रोलचे प्रतिलिटर दर १००.२१ रुपये झाले आहेत, तर डिझेल दर ८९.५३ रुपये प्रतिलिटर झाला आहे. मुंबईत पेट्रोल दर १०६.२५ रुपये, डिझेल ९७.०९ रुपये झाले आहे.

❖ शिक्षकांनी वृत्तपत्रामध्ये आलेल्या घटनेची किंवा परिसरातील नुकत्याच घडलेल्या एका घटनेची वर्गात चर्चा घ्यावी. घटनेविषयी विद्यार्थ्यांना काय वाटले किंवा त्यांचे मत काय आहे हे सांगण्यास सांगावे. **उदा. पेट्रोल दरवाढीचा कोणकोणत्या गोष्टींवर परिणाम होईल असे तुला वाटते ?**

सक्षम बनू या -

❖ शिक्षकांनी वर्गातील काही विद्यार्थ्यांना त्यांच्या घरात अथवा परिसरात झालेला एक कार्यक्रम याविषयी बोलण्यास सांगावे. इतर विद्यार्थ्यांना ते ऐकून काय वाटले? ते त्या प्रसंगात / कार्यक्रमात असते तर त्यांनी काय केले असते? याविषयी बोलण्यास सांगावे.

शिक्षकांनी इंटरनेटवरून घटना / प्रसंग अथवा कार्यक्रम दाखवून विद्यार्थ्यांना प्रतिक्रिया व्यक्त करण्याची संधी द्यावी.

सराव करू या -

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे गट पाडावेत. प्रत्येक विद्यार्थ्याला **माझा पहिला ऑनलाईन तास / माझा वाढदिवस किंवा कोरोना काळातील काळजी** यापैकी एका विषयावर गटात बोलण्यास सांगावे. इतर विद्यार्थ्यांना त्या विषयी प्रश्न विचारण्यास सांगावे तसेच स्वतःचे मत व्यक्त करण्यास सांगावे.

❖ तुमच्या परिसरामध्ये एक सार्वजनिक नळ आहे. तो बंद करण्यास लोक विसरतात तर तुम्ही काय कराल ? (दिलेल्या उत्तरावर इतर विद्यार्थी काय करतील ते विचारावे.)

दिवस २०

क्षेत्र - वाचन
संकल्पना - समजपूर्वक वाचन

अध्ययन निष्पत्ती-

६ वी - योग्य गतीसह समजपूर्वक प्रकट वाचन व मुक्त वाचन करतात.
७ वी - सार्वजनिक ठिकाणच्या सूचना समजपूर्वक वाचता येणे.

जाणून घेऊ या -

(शिक्षकांनी खालील उतारा विद्यार्थ्यांना वाचावयास सांगावा.)


दिनेशने सोसायटीत प्रवेश केला. सोसायटीच्या प्रवेशद्वाराजवळ लावलेल्या फळ्यावर सुविचार लिहिला होता. 'प्रत्येक मानवाची गरज पूर्ण करण्यास निसर्ग समर्थ आहे; त्याला कोणतीही हाव नाही.' दिनेश विचार करू लागला, 'या सुविचारातून निसर्गाचे किती वास्तव स्वरूप दाखवले आहे.'

निसर्गातील प्रत्येक घटकाला देणे माहीत आहे, घेणे नाही. झाडे, वेली, पाने, फुले, नदया, पर्वत, डोंगर, पशु,पक्षी, माती, चंद्र, सूर्य, तारे... निसर्गातील असे अनेक घटक आपले जीवन सुखकर व्हावे म्हणून मदतीला असतात.आपल्याला निसर्गाला काही देता आले नाही तर देऊ नये; पण त्याच्याकडून काही ओरबाडून घेऊ नये. निसर्ग आपला मित्र आहे. आपण त्याचे मित्र का बनू नये?

(विद्यार्थ्यांनी उतारा वाचल्यावर शिक्षकांनी त्यावर आधारित खालील प्रश्न विचारावेत.)

१. दिनेशने कोणता सुविचार वाचला ?
२. निसर्गाचे कोणकोणते घटक या उताऱ्यात सांगितले आहेत ?
३. आपण निसर्गाला काय देऊ शकतो ?

सक्षम बनू या -



❖ (शिक्षकांनी विद्यार्थ्यांना कात्रणातील मजकुराचे प्रकट वाचन करायला सांगून त्यावर आधारित खालील प्रश्न विचारावेत.)

१. अग्निशमनदल कोणकोणती कामे करते ?
२. अग्निशमनदलाची मदत घेण्यासाठी कोणत्या क्रमांकावर फोन लावतात ?
३. आपत्कालीन परिस्थितीमध्ये उपयोगी पडणाऱ्या इतर यंत्रणांची नावे सांग.

सराव करू या -

शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून लिखित किंवा छापील मजकुरातील गोष्टींचे वर्गात नियमित प्रकट वाचन करून घ्यावे व त्यावर एकत्रित चर्चा करून सारांश विचारावा.

दिवस २१

क्षेत्र - लेखन
संकल्पना - अनुभवलेखन

अध्ययन निष्पत्ती-

६ वी - चित्रवर्णन स्वतःच्या शब्दात लिहितात.
७ वी - चित्र / प्रसंग वर्णन स्वतःच्या शब्दात लिहितात.

जाणून घेऊ या -



❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे,विविध प्रश्न विचारून विद्यार्थ्यांना बोलते करावे, सांगितलेली उत्तरे लिहिण्यास सांगावी. उदा. चित्रातील मुलगा काय करतो आहे? इ

सक्षम बनू या -

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक, मासिके यामधील विविध चित्रे दाखवून चित्राचे वर्णन करण्यास सांगावे व ते स्वतःच्या शब्दांत लिहिण्यास प्रोत्साहन द्यावे.

सराव करू या -

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पहाटेच्या वेळी पूर्व दिशेला दिसणाऱ्या दृश्याचे वर्णन स्वतःच्या शब्दांत लिहिण्याचा सराव करण्यास सांगावे .

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सायंकाळी नदीकाठी गेल्यावर दिसणाऱ्या देखाव्याचे वर्णन स्वभाषेत लिहिण्यास सांगावे .

दिवस २२

क्षेत्र - भाषाभ्यास
संकल्पना - वाकप्रचार व म्हणी

अध्ययन निष्पत्ती-

६ वी - विद्यार्थी वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळ्या उद्देशांनुसार लिहिताना शब्द, वाक्य, वाक्प्रचार, म्हणी यांचा योग्य वापर करतात.

७ वी - विद्यार्थी वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळ्या उद्देशांनुसार लिहिताना शब्द, वाक्य, वाक्प्रचार, म्हणी यांचा योग्य वापर करतात.

जाणून घेऊ या -

अ गट	ब गट
ग ची बाधा होणे	म्हण
सरड्याची धाव कुंपणापर्यंत	वाक्प्रचार
कोल्हा काकडीला राजी	वाक्प्रचार
कुतूहल निर्माण होणे	म्हण

(वरील अ व ब गटातील जोड्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून लावून घेऊन म्हणी व वाक्प्रचार या संकल्पना दृढ करून घ्याव्यात.)

सक्षम बनू या -

डोंगर पोखरून , डोक्यावर घेणे, उंदीर, काढणे,
घर, बुडत्याचा पाय, मान मरातब, खोलात,

❖ वरील आकृतीमधील योग्य शब्दसमूह वा क्रियापदे वा शब्द योग्य ठिकाणी एकत्र आणून तयार होणाऱ्या म्हणी व वाक्प्रचार शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शोधायला सांगाव्यात.

सराव करू या -

❖ चौकटीमधील म्हणी व वाक्प्रचार शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून शोधून घेऊन अशी कोडी तयार करायला सांगावीत.

दुरून	देणार	साजरे	त्याला
लावणे	डोंगर	गावाला	देव
खाणार	तोंडघशी	कळसा	पडणे
काखेत	वळसा	साखरेचे	दिवे

दिवस २३

क्षेत्र - श्रवण, भाषण –संभाषण
संकल्पना - संवाद साधने, मत मांडणे

अध्ययन निष्पत्ती-

६ वी- मोठ्या माणसांच्या संवादात, मित्रांच्या गट चर्चेत सहभागी होऊन आपले मत सुस्पष्टपणे मांडतात.

७ वी - सर्व वयोगटातील व्यक्तींसमवेत प्रसंगानुरूप संवाद, गट चर्चा यात सहभाग घेतात.

जाणून घेऊ या -



❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील चित्राचे निरीक्षण करायला सांगून त्या चित्रात शालेय विद्यार्थी व बागेत बसलेले कुटुंब यांच्यात काय संवाद झाला असेल यावर प्रश्नांद्वारे चर्चा करण्यास सांगावी. शिक्षकांनी सार्वजनिक स्वच्छता या विषयावर विद्यार्थी गटामध्ये माहितीपर चर्चा घडवून आणून त्याचे सादरीकरण करून घ्यावे.

सक्षम बनू या -



❖ शिक्षकांनी वरील चित्राचे निरीक्षण करायला सांगून तुलनात्मक चर्चा विद्यार्थी गटामध्ये करण्यास सांगावी. 'झाडे लावा, झाडे जगवा' ही संकल्पना विद्यार्थी परिसरातील लोकांना, मित्र-मंडळींना, नातेवाईकांना कशाप्रकारे समजावून देतील याची चाचपणी शिक्षकांनी करावी.

❖ यु-ट्युब वरील व्हिडीओच्या माध्यमातून विद्यार्थी कोरोना लक्षणे व काळजी या संदर्भातील माहिती मिळवतात आणि इतरांना सांगतात.

(शिक्षकांनी या संदर्भात इंटरनेटवरून व्हिडीओ उपलब्ध करून घ्यावा व व्हिडीओ पाहत असताना चर्चा घ्यावी.)

दिवस २४

क्षेत्र - वाचन
संकल्पना - प्रकट वाचन

अध्ययन निष्पत्ती-

६ वी - योग्य गतीसह समजपूर्वक प्रकट वाचन व मूकवाचन करतात.
७ वी - सार्वजनिक ठिकाणच्या सूचना समजपूर्वक वाचता येणे.

जाणून घेऊ या -

❖ शिक्षकांनी खाली दिलेल्या पत्राचे मूकवाचन करावयास सांगावे.

प्रिय वैष्णवी..

अनेक शुभाशीर्वाद. मी कामात होतो. म्हणून पत्र पाठवायला उशीर होत आहे. तुझ्या आईने मला दूरध्वनीवरून सांगितले की तुला सहामाहीचा गणिताचा पेपर खूप कठीण गेला. म्हणून तू फार निराश झाली आहेस. अगं वैष्णवी गणिताचा पेपर कठीण गेला म्हणून यानंतर असलेल्या विषयांचे पेपर अवघड जाणार असे होत नाही ना. मग त्या गोष्टीचा विचार करत असल्याने उरलेल्या पेपरवरही त्याचा परिणाम होतो .

अगं, एखाद्या विषयात गुण कमी पडले तर याचा अर्थ आपण आयुष्यात अपयशी झालो असे नाही. तुला सांगतो तू गणिताशी मैत्री कर मग बघ गंमत या विषयाची. बाळा आणखी एक तुला सांगतो परीक्षेतील गुण किंवा श्रेणी महत्त्वाची आहेच. पण त्याहीपेक्षा आपल्या आंतरिक गुणांची वाढ करणे हे अधिक महत्त्वाचे आहे. तू गोष्टी छान सांगतेस चित्र उत्तम काढतेस. नृत्यही छान करतेस. हे सारं सुरू ठेव. दिवाळीच्या सुट्टीत मी गावी येणार आहे. आपण खूप मज्जा करू आणि हो.. तुझ्या आवडीचा खाऊ मी घेऊन येणार आहे. ओळख... तुझा पुस्तकांचा खजिना. आता थांबतो. बाकी सगळे भेटल्यावर बोलू.

तुझे बाबा

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मूकवाचन झाल्यावर समजपूर्वक वाचन केले आहे का हे पाहण्यासाठी खालील प्रश्न विचारावे.

१ . वैष्णवीला कोणत्या विषयाचा पेपर कठीण गेला?
२. परीक्षेतील गुण व श्रेणीबरोबरच अजून काय महत्त्वाचे आहे असे बाबा म्हणतात.
३. सुरेश दिवाळीच्या सुट्टीत बाबा वैष्णवीसाठी कुठला खाऊ आणणार आहेत?

सक्षम बनू या -

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील, मासिकातील उतारे वाचायला सांगून त्याविषयी वर्गात एकत्रित चर्चा करावयास सांगावी त्यातून आपल्याला काय माहिती मिळाली ती फळ्यावर लिहावयास सांगावे.

सराव करू या -

❖ शिक्षकांनी पाठ्यपुस्तकातील पाठ मूकवाचन करून त्याप्रमाणे त्यामध्ये असलेले स्वाध्याय प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांना देण्यास सांगावी.

दिवस २५

क्षेत्र - लेखन
संकल्पना - व्याकरणाचा लेखनात उपयोग

अध्ययन निष्पत्ती-

६ वी - विविध विषयांसाठी ,विविध उद्देशांसाठी विरामचिन्हांचा योग्य वापर करून लेखन करतात.
७ वी- विविध विषयांसाठी ,विविध उद्देशांसाठी विररामचिन्हांचा योग्य वापर करून लेखन करतात.

जाणून घेऊ या -

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना लेखनात विरामचिन्हांना असलेले महत्त्व सांगावे. भाषेत कथा,कादंबरी,नाटक इत्यादी साहित्य प्रकारात अनेकदा संवाद,संभाषणे यांचा समावेश असतो . अशा ठिकाणी आपल्याला विरामचिन्हांचा खूप उपयोग होतो. वाचत असताना अर्थ लक्षात घेऊन आपण थांबतो . या थांबण्याला विराम घेणे असे म्हणतो. हा विराम कमी -जादा असतो. हे दाखवण्यासाठी आपण विरामचिन्हांचा वापर करतो.

सक्षम बनू या -

❖ शिक्षकांनी दिलेला उतारा विद्यार्थ्यांना लिहिण्यास सांगावा.दिलेल्या उताऱ्याचे विद्यार्थ्यांकडून वाचन घेऊन , विरामचिन्हांचा कसा वापर केला आहे ते समजून सांगावे.

"आवडले का तुला हे पुस्तक ?""हो ! जेवल्यानंतर मी सर्व गोष्टी वाचून टाकणार आहे." जयंत म्हणाला.
वडील म्हणाले,"रामायण कुणी लिहिले ,आहे का ठाऊक ? रामायण लेखक हा एक अडाणी कोळी होता. पुढे तो मोठा ऋषी झाला."
"कोळी होता ?" जयंताने मध्येच विचारले. "हो !" वडील सांगू लागले , "फार वर्षांपूर्वीची गोष्ट .... "

सराव करू या -

❖ विद्यार्थ्यांनी भावना व्यक्त करणारी विविध वाक्ये लिहिण्याचा सराव करावा . आनंद, दुःख, राग,द्वेष इ. उदा. शाबास !छान खेळलास. इ.

दिवस २६

क्षेत्र - भाषाभ्यास
संकल्पना - विरामचिन्हे

अध्ययन निष्पत्ती-

६ वी - विद्यार्थी विविध विषयांसाठी, विविध उद्देशांसाठी विरामचिन्हांचा योग्य वापरकरून लेखन करतात. (विरामचिन्हे)

७ वी - विद्यार्थी विविध विषयांसाठी, विविध उद्देशांसाठी विरामचिन्हांचा योग्य वापरकरून लेखन करतात. (विरामचिन्हे)

जाणून घेऊ या -

१) गुलमोहोर ! किती सुरेख नाव !
२) 'राजगड' बेलाग किल्ला आहे.
३) बाबासाहेब म्हणाले, " मी संग्रहालयात येईन. "
वरील वाक्यांतील !, ' ', " "

❖ या चिन्हांची ओळख शिक्षकांनी विद्यार्थ्यांना करून द्यावी. बोलताना मधून मधून थांबणे याला विराम म्हणतात व हा विराम वेगवेगळ्या चिन्हांनी दाखवतात त्या चिन्हांना विरामचिन्हे म्हणतात ही संकल्पना अजून काही उदाहरणांमधून शिक्षकांनी स्पष्ट करावी.

सक्षम बनू या -

❖ राग, आनंद, भीती या भावना व्यक्त करणारी वाक्ये शिक्षकांनी फळ्यावर लिहावीत.बोलणाऱ्याच्या तोंडचे शब्द, वाक्ये शिक्षकांनी फळ्यावर लिहावीत.एखाद्या शब्दसमूहावर जोर देणारे वाक्य शिक्षकांनी फळ्यावर लिहावे. विद्यार्थ्यांकडून या वाक्यांचे वाचन करून घ्यावे.

सराव करू या -

❖ शिक्षकांनी पुढील कृती विद्यार्थ्यांना करावयास सांगाव्यात.

१ चिन्हे लिहा. उद्गारचिन्ह ----- , एकेरी अवतरण चिन्ह ---- , दुहेरी अवतरण चिन्ह ---

२ वाक्यांमध्ये योग्य चिन्हे वापरा व वाक्ये लिहा.

* जिवंतपणा इथल्या जमिनीत आहे.
* केवढी उत्तुंग ही माची
* मावळे म्हणाले आम्ही प्राणपणाने लढू.

दिवस २७

क्षेत्र - श्रवण, भाषण –संभाषण
संकल्पना - स्व-अभिव्यक्ती

अध्ययन निष्पत्ती-

६ वी - पाहिलेल्या व ऐकलेल्या गोष्टी / घटना /मुद्दे स्वतःच्या भाषेत कथन करतात, लिहितात.
उदा.अपूर्ण गोष्ट पूर्ण करणे,प्रसंगाचे वर्णन करणे.
७ वी - पाहिलेल्या व ऐकलेल्या गोष्टी / घटना /मुद्दे स्वतःच्या भाषेत कथन करतात, लिहितात.

जाणून घेऊ या -

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना एक गोष्ट सांगावी. त्या गोष्टीचा शेवट बदलून विद्यार्थ्यांना पुन्हा योग्य क्रमाने गोष्ट सांगण्यास सांगावी.

सक्षम बनू या -

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मैदानावर घडलेल्या एखाद्या घटनेचे वर्णन त्यांच्या भाषेत सांगण्यास सांगावे.



❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील चित्रावर प्रश्न विचारावेत. उदा. तुम्ही त्या ठिकाणी असता तर काय केले असते?, तुमच्या परिसरामध्ये अजून कोणकोणती ठिकाणे आहेत जिथे जाऊन तुम्ही श्रमदान करू शकता?

सराव करू या -

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना ऑनलाईन किंवा ऑफलाईन स्वरूपात गोष्ट दाखवावी. पाहिलेली गोष्ट किंवा गोष्टीतील विद्यार्थ्यांना महत्त्वाचे वाटलेले मुद्दे सांगण्यास सांगावे.

❖ शिक्षकांनी वर्गात गोष्ट सांगावी अथवा घटना सांगावी, त्या गोष्टीतील महत्त्वाचे मुद्दे मुलांना वहीत नोंदवण्यास सांगावेत .

दिवस २८

क्षेत्र - वाचन
संकल्पना - मूकवचन

अध्ययन निष्पत्ती-

६ वी - योग्य गतीसह समजपूर्वक प्रकटवाचन व मूकवाचन करतात.
७ वी – योग्य गतीसह समजपूर्वक प्रकटवाचन व मूकवाचन करतात.

जाणून घेऊ या -

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना योग्य हावभावांसह आरोह-अवरोह असलेले वाचनाचे उत्तम ऑडिओ मोबाईलवर ऐकवावेत. त्यावर आधारित प्रश्न विचारावेत, ऑडिओ निवडीचे स्वातंत्र्य शिक्षकांना आहे युट्युब वरील व्हिडीओ किंवा उत्तम विनोदाच्या स्वरातील ऑडिओ देखील शांत रेकॉर्ड करून ते ऐकवावेत.

सक्षम बनू या -

❖ विद्यार्थ्यांनी स्वतः पालकांच्या मोबाईल मधून नवनवीन वाचनाचे ऑडिओ ऐकून त्यावर एकत्र येऊन चर्चा करावी.

सराव करू या -

❖ विद्यार्थ्यांनी स्वतःच्या प्रकट वाचनाचा व्हिडिओ ऑडिओ करून स्वतः ऐकावा व त्यात काय चूक किंवा अजून काय सुधारणा करता येईल या बाबतीत शिक्षकांशी चर्चा करून प्रकट वाचन पुन्हा करावे.

दिवस २९

क्षेत्र - लेखन
संकल्पना - व्याकरणाचा लेखनात वापर

अध्ययन निष्पत्ती-

६ . वी विविध विषयांसाठी ,विविध उद्देशांसाठी विरामचिन्हांचा योग्य वापर करून लेखन करतात.
७ वी . विविध विषयांसाठी ,विविध उद्देशांसाठी विरामचिन्हांचा योग्य वापर करून लेखन करतात.

जाणून घेऊ या -

❖ शिक्षकांनी पाठ्यपुस्तकातील उतारा निवडून विद्यार्थ्यांना लिहिण्यास सांगावा . (उतारा जास्तीत जास्त विरामचिन्हे असणारा निवडावा) त्यामध्ये आलेल्या विरामचिन्हांचा उपयोग कसा केला आहे ? चर्चा करावी.

सक्षम बनू या -

❖ खाली दिलेला उतारा विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावा आणि योग्य तेथे विरामचिन्हे वापरण्यास सांगावीत . उतारा लिहून झाल्यावर शिक्षकांनी त्याच उताऱ्यात योग्य विरामचिन्हे वापरावीत . विदयार्थ्यांना तपासण्यास सांगावे.

सुमीतने कागद शाई मिळवली कामटीचा बोरू केला कागदावर लिहिलं - श्रीमंत सयाजीराव महाराज की जय महाराजांनी त्याला जरीची टोपी बक्षीस दिली विद्याधिकाऱ्यांकडे वळून ते म्हणाले पोरगा गुणी आहे त्याकडे लक्ष द्या उद्याचं हे बडोद्याचे रत्न आहे

सराव करू या -

❖ विदयार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील उतारे लिहिण्यास सांगावेत . त्यामध्ये आलेली विरामचिन्हे पाहावीत व समजून घ्यावीत.

❖ वर्तमानपत्रातील, मासिकातील विनोद, संवाद लिहिण्याचा सराव करावा तेथे विरामचिन्हांचा वापर कसा केला आहे ते समजून घ्यावे .

दिवस ३०

इयत्ता- ७ वी
गुण-१५

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे

सेतू अभ्यास चाचणी क. २ - (दिवस सोळावा ते एकोणतीसावा)

.....

प्रश्न:१.खालील कवितेचे वाचन करून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही. (गुण ५)

अरे, संसार संसार, जसा तवा चुल्ह्यावर
आधी हाताला चटके तव्हा मिळते भाकर !

अरे, संसार संसार, खोटा कधी म्हनू नही
राउळाच्या कयसाले, लोटा कधी म्हनू नही

अरे, संसार संसार, नही रडनं, कुढनं
येड्या, गयातला हार, म्हनू नको रे लोढनं !

अरे, संसार संसार, खीरा वेलावरचा तोड
एक तोंडामधी कडू, बाकी अवघा लागे गोड

अरे, संसार संसार, म्हनू नको रे भीलावा
त्याले गोड भीमफूल, मधी गोडव्याचा ठेवा

(आरोह अवरोहासहित कवितेच्या प्रकट वाचनासाठी २ गुण व योग्य उत्तरासाठी प्रत्येकी १ गुण दयावा.

अ) संसार आणि तवा यांत कवयित्रीने काय संबंध जोडला आहे ?

ब) संसाराविषयी कवयित्रीची सकारात्मक मते कोणती ?

क) कवितेला योग्य शीर्षक दया.

प्रश्न.२. शिक्षकांनी ऐकवलेली गोष्ट स्वत:च्या शब्दांत लिही. (गुण ३)

प्रश्न.३. खाली दिलेल्या वाक्यांत योग्य विरामचिन्हे वापरा. (गुण ३)

१) बापरे केवढी मोठी ही गुहा

२) प्रामाणिक हुशार मेहनती मुले सर्वांना आवडतात

प्रश्न.४. खालील अधोरेखित नामांची भिन्नवचनी रूपे लिहून वाक्य पुन्हा लिही. (गुण २)

१) लांडोर पावसात ओरडते.

२) आंबा झाडावरून पडला.

प्रश्न.५. सोबत दिलेल्या चित्राचे वर्णन स्वत:च्या शब्दांत लिही. (गुण २)



दिवस ३१

क्षेत्र - भाषाभ्यास
संकल्पना - शुद्धलेखनाचे नियम

अध्ययन निष्पत्ती-

६ वी - विद्यार्थी व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा योग्य वापर करतात. (शुद्धलेखनाचे नियम)
७ वी - विद्यार्थी व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा योग्य वापर करतात. (शुद्धलेखनाचे नियम)

जाणून घेऊ या -

१) तू शिस्तप्रिय आहेस.
२) मी सुवाच्य अक्षर लिहितो.

वरील वाक्यातील अधोरेखित शब्द 'एकाक्षरी' आहेत व उकार व वेलांटी दीर्घ आहे. हा एकाक्षरी शब्द ('नि' अपवाद)नियम शिक्षकांनी विद्यार्थ्यांना स्पष्ट करावा.

* पाहुणी , पेरू या शब्दात शेवटच्या अक्षराची वेलांटी व उकार नेहमी दीर्घ लिहितात. हा नियम शिक्षकांनी विद्यार्थ्यांना स्पष्ट करावा.

*माणूस, जमीन या शब्दात शेवटचे अकारांत व शेवटून दुसऱ्या अक्षराला दिलेला उकार व वेलांटी दीर्घ मात्र संस्कृतमधून आलेले तत्सम शब्द मात्र जसेच्या तसे लिहितात, (उदाहरणार्थ गुण,प्रिय)हा लेखननियम शिक्षक विद्यार्थ्यांना शिकवावा.

*बाहुली, भिडू या शब्दांमध्ये शेवटचे अक्षर दीर्घ स्वरांत पण उपांत्य अक्षरातील इकार, उकार ऱ्हस्व लिहितात) व तत्सम शब्दांमध्ये मात्र उपांत्य अक्षर दीर्घ असेल तर ते संस्कृतप्रमाणेच लिहावे हा लेखननियम शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवावा .

सक्षम बनू या -

❖ वरील नियमांना अनुसरून शब्द शिक्षकांनी फळ्यावर लिहावे व विद्यार्थ्यांकडून नियम ओळखून घ्यावेत.

सराव करू या -

१) पुढील पर्यायांपैकी अशुद्ध नसलेला शब्द लिहा.

१) वकिली / वकीली / वकिलि ------
२) वस्तु / वस्तू / वसतू ------

२) कंसातील योग्य शब्द लिहा.

१) सूर्योदय ----- दिशेला होतो. (पुर्व , पूर्व , पूरव)
२) ----- मन शांत करते. (संगीत , संगित , सनगीत)

३) पुढील शब्द शुद्ध करून लिहा.

१) शरिर ---- २) मनूका ----

दिवस ३२

क्षेत्र - श्रवण, भाषण –संभाषण
संकल्पना - साभिनय कविता गायन

अध्ययन निष्पत्ती-

६ वी -कविता, गाणी अभिनयासह व योग्य आरोह-अवरोहासह आनंददायी पद्धतीने म्हणतात.
७ वी -कविता, गाणी अभिनयासह व योग्य आरोह-अवरोहासह आनंददायी पद्धतीने म्हणतात.

जाणून घेऊ या -

- शिक्षकांनी पाठ्यपुस्तकातील (पठीत) कविता / गाणे मुलांना ऐकवावे. मुलांकडून आरोह – अवरोहासह म्हणून घ्यावे. उदा. पाऊस आला ! पाऊस आला!
- पावसावरील इतर कोणते गाणे विद्यार्थ्यांना येत असल्यास ते त्यांच्या चालीमध्ये म्हणून घ्यावे.

सक्षम बनू या -

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या परिसरातील, बालपणातील गाणी अभिनयासह म्हणून घ्यावीत.
- इंटरनेटवर / दीक्षा ॲपवर उपलब्ध आनंददायी गाणी / कविता मुलांना दाखवावीत, ऐकवावीत व म्हणून घ्यावीत.

सराव करू या -

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गटात / वैयक्तिक एका गीताचे हाव – भावासहीत व आरोह – अवरोहा - सहित सादरीकरण करून घ्यावे.

दिवस ३३

क्षेत्र - वाचन
संकल्पना - मूकवचन

अध्ययन निष्पत्ती-

६ वी – वर्तमानपत्रे, मासिके व पुस्तके यातील बालसाहित्याचे समजपूर्वक वाचन करून आस्वाद घेतात, संग्रह करतात.

७ वी - वर्तमानपत्रे ,मासिके व पुस्तके यातील बालसाहित्याचे समजपूर्वक वाचन करून आस्वाद घेतात, संग्रह करतात.

जाणून घेऊ या -

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध प्रकारची वर्तमानपत्रे वाचावयास द्यावी. दैनिक लोकमत, पुण्यनगरी, सकाळ, देशदूत, देशोन्नती, लोकसत्ता, आणि त्यात लहान मुलांसाठी असलेले साहित्य शोधून वाचावयास सांगावे. वाचलेले साहित्य इतरांना दाखवून विद्यार्थ्यांना चर्चा करावयास सांगावे. ते वाचत असताना त्यातून काय भावना निर्माण होतात त्याचे प्रकटीकरण देखील करावयास सांगावे.

सक्षम बनू या -

१. तुम्ही कोणकोणते बालसाहित्य आत्तापर्यंत वाचले आहे ?

२. लहान मुलांसाठी वर्तमानपत्रात कोणकोणत्या दिवशी विशेष साहित्य पाठवले जाते?

३. दररोज येणाऱ्या वर्तमानपत्रात कोणत्या पानावर बालसाहित्य येते ?

❖ अशा प्रकारचे प्रश्न शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विचारावेत आणि याद्वारे विद्यार्थ्यांशी चर्चा करावी. तसेच त्यांनी वाचलेल्या बालसाहित्याची वर्तमानपत्रातील कात्रणे जमा करून ठेवण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

सराव करू या -

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दररोज वर्तमानपत्रातील बालसाहित्य वाचन करून त्याचा संग्रह करण्यास सांगावे. नियमित ते वर्गात सादर करण्यास सांगावे. त्यावर चर्चा घडवून आणावी म्हणजे मुलांना साहित्यातील मूळ भाव समजून घेता येतो. काही मुलं जी अगोदरपासून असे संग्रह करतात त्यांचा संग्रह विद्यार्थी व शिक्षकांसमोर प्रकट करावयास सांगावा. त्यातून इतरांना संग्रह करण्याची प्रेरणा मिळेल.

दिवस ३४

क्षेत्र - लेखन
संकल्पना - अनुभवलेखन

अध्ययन निष्पत्ती-

६ वी - पहिलेल्या ऐकलेल्या गोष्टी/घटना/मुद्दे स्वत:च्या भाषेत कथन करतात, लिहितात.
७ वी – पहिलेल्या ऐकलेल्या गोष्टी/घटना/मुद्दे स्वत:च्या भाषेत कथन करतात, लिहितात.

जाणून घेऊ या -

❖ शिक्षकांनी अचानक पडणा-या पावसामुळे सर्वांची कशी तारांबळ उडते? यावर चर्चा घडवून आणून विद्यार्थ्यांना चर्चेतील मुद्दे लिहिण्यास सांगावेत.उदा. आईची उडालेली गडबड, पक्षी-प्राणी यांचे धावणे इ.

सक्षम बनू या -

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना स्वत:च्या भाषेत लिहिण्यास प्रवृत्त करावे .

❖ अचानक पडणा-या पावसामुळे शेतक-याची उडालेली तारांबळ.

❖ बाजारात फेरीवाल्यांची झालेली गडबड मित्राला पत्राने कळविण्यास सांगणे.

सराव करू या -

❖ विद्यार्थ्यांनी शेतक-याला भेटून पावसाळ्याच्या सुरुवातीला कोणती कामे करावी लागतात. ते विचारून लिहिण्याचा सराव करावा.

❖ उन्हाळ्यात आई साठवणीचे कोणते पदार्थ करते त्याची यादी तयार करावी.उदा.सांडगे,पापड इ .

दिवस ३५

क्षेत्र - भाषाभ्यास
संकल्पना - काळ

अध्ययन निष्पत्ती-

६ वी – विद्यार्थी व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा योग्य वापर करतात. (काळ)

जाणून घेऊ या -

१) डॉक्टर अचूक उपचार करतात. ------- वर्तमानकाळ
२) डॉक्टरांनी अचूक उपचार केले. ------- भूतकाळ
३) डॉक्टर अचूक उपचार करतील. ------- भविष्यकाळ

वरील वाक्यांमधून अनुक्रमे 'आता', 'पूर्वी', 'पुढे' या काळांमध्ये क्रिया घडतात, हे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना निदर्शनास आणून द्यावे. करतात, केले, करतील या क्रियापदांमधून काळ या संकल्पनेची ओळख शिक्षकांनी विद्यार्थ्यांना करून द्यावी.

सक्षम बनू या -

❖ खालील उदाहरणांमधील काळ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना ओळखायला लावून काळ संकल्पना विद्यार्थ्यांकडून दृढ करून घ्यावी.

१) सामना रंगला होता.
२) आम्ही गावाला जाऊ.
३) पुस्तक जाड आहे.

सराव करू या -

❖ शिक्षकांनी दोन गट करावेत व खालील सराव खेळ घ्यावा.

एका गटाने दुसऱ्या गटास वाक्य द्यायचे व काळ ओळखायला लावायचा. ज्या गटाचे उत्तर चुकेल त्या गटातील विद्यार्थी प्रश्न विचारणाऱ्या गटात जाईल . असे खेळत ज्या गटात जास्त विद्यार्थी होतील त्या गटाला विजयी गट घोषित करायचे.

दिवस ३६

क्षेत्र - श्रवण, भाषण –संभाषण
संकल्पना - परिपाठ

अध्ययन निष्पत्ती-

६ वी - सुविचार, संदेश, कथा परिपाठात सादर करतात.
७ वी - परिपाठ व इतर कार्यक्रमांतून सुविचार, कथा, विविध विषय मांडण्याची संधी उपलब्ध करून दिली जावी.

जाणून घेऊ या -

❖ शिक्षकांनी शालेय परिपाठ हा व्हिडिओ यु – ट्यूबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ऐकवावा व परिपाठ घेताना क्रमाने येणा-या मुद्यांची लेखी नोंद करण्यास सांगावी.

सक्षम बनू या -

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना बोधपर कथा सांगून त्याचा वापर परिपाठात कसा करता येईल यावर चर्चा करण्यास सांगावी.

सराव करू या -

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना "बालिका दिना" निमित्त कोणता संदेश परिपाठातून द्याल यावर चर्चा करण्यास सांगावे.

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सुविचार व त्याचा सखोल अर्थ यावर चर्चा करून घ्यावी.

दिवस ३७

क्षेत्र -लेखन
संकल्पना -स्व- अभिव्यक्ती

अध्ययन निष्पत्ती-

६ वी - पाहिलेल्या ऐकलेल्या गोष्टी/घटना/मुद्दे स्वतःच्या भाषेत कथन करतात,लिहितात.
७ वी - पाहिलेल्या ऐकलेल्या गोष्टी/घटना/मुद्दे स्वतःच्या भाषेत कथन करतात,लिहितात

जाणून घेऊ या -



राज्यात रविवारी ३,५००
लोकांनी केले रक्तदान

लोकमत न्यूज नेटवर्क
मुंबई : रविवारी सुट्टीच्या दिवशीही लोकमत रक्तदान मोहिमेत उत्साहाने भाग घेत राज्यात ३,५०० लोकांनी रक्तदान केले.
ठाणेकरांनी या मोहिमेला मोठा प्रतिसाद दिला. ४७७ लोकांनी ठाण्यात रक्तदान केले. मुंबईत १५२, पालघरमध्ये ८६, फलटणमध्ये २३३ लोकांनी रक्तदान केले. परभणी

लोकमत रक्तदान नाते

जिल्ह्यातील जिंतूर येथे ३४७ लोकांनी उत्साहाने रक्तदान केले. तेथे आयपीएस अधिकारी, दोन शिक्षणाधिकारी, पोलीस निरीक्षक यांनीही रक्तदान करून आपला सक्रिय सहभाग नोंदविला. कोल्हापूरमध्ये तब्बल ६६५, तर नागपूर-२५४, सांगली-१८८, नाशिक-१४१, पुणे-२४५, पिंपरी-चिंचवड येथे १३७ लोकांनी रविवारी रक्तदान केले.

❖ बातमीचा विषय कोणता आहे ? ही परिस्थिती का निर्माण झाली ? यासाठी माणसाने काय केले पाहिजे? यावर वर्गात चर्चा करावी, व विद्यार्थ्यांनी मिळणारी माहिती स्वतःच्या भाषेत लिहावी .

सक्षम बनू या -

❖ शिक्षकांनी ऐतिहासिक, सामाजिक,क्रीडा इ . क्षेत्राशी संबंधित घडलेल्या घटना वर्गात सांगाव्यात. विद्यार्थ्यांनी त्या ऐकून लिहिण्याचा सराव करावा.

सराव करू या -

❖ सभोवतालच्या परिसरातील घडलेल्या घटना घरातील माणसांशी,मित्र - मैत्रिणींशी चर्चा करून लिहिण्याचा सराव करावा . अवांतर वाचन करावे , वाचलेल्या काही घटना, गोष्टी स्वतःच्या भाषेत लिहिण्याचा सराव करावा .

दिवस ३८

क्षेत्र - वाचन
संकल्पना - मासिकातील बालसाहित्य


अध्ययन निष्पत्ती-

६ वी – वर्तमानपत्रे, मासिके व पुस्तके यातील बालसाहित्याचे समजपूर्वक वाचन करून आस्वाद घेतात संग्रह करतात.
७ वी – वर्तमानपत्रे, मासिके व पुस्तके यातील बालसाहित्याचे समजपूर्वक वाचन करून आस्वाद घेतात संग्रह करतात.

जाणून घेऊ या -

❖ शिक्षकांनी शैक्षणिक व अवांतर अशी वेगवेगळी मासिके उदा: किशोर, शैक्षणिक संक्रमण, शिक्षक ध्येय व जीवन शिक्षण यासारखी मासिके विद्यार्थ्यांना वाचायला सांगावीत. बालसाहित्याचे वाचन करून घ्यावे व त्यावर आधारित प्रश्न विचारावेत.





१. सोबतचे गाणे कशा बद्दल आहे?
२. प्रांजलला कोण कोणते प्रश्न पडत आहेत?

सक्षम बनू या -

❖ शिक्षकांनी वेगवेगळी मासिके विद्यार्थ्यांना वाचावयास सांगावीत व त्यातील लहान मुलांसाठीचा मजकूर एकमेकांना सांगण्यास सांगावा. तसेच त्यात काय आवडले यावर चर्चा घ्यावी. उदाहरणार्थ 'किशोर' मासिकामध्ये मुलांना आनंददायी गीताबरोबर व्यवहारोपयोगी अशा गोष्टी, लेख व कृती देखील आहेत 'शिक्षक ध्येय' या मासिकात मुलांना कोरोना काळात अभ्यास कसा करावा याबाबत मार्गदर्शन आहे या बाबी मुलांना अवगत करून द्याव्यात.

सराव करू या -

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांच्या मदतीने वेगवेगळी मासिके जमवून वाचन करावयास सांगावे. त्यातील बालसाहित्याचे संग्रह करून एक चिकट वही तयार करण्यास सांगावी. शाळेतील वेगवेगळ्या प्रसंगानुरूप कोणते साहित्य सादर करता येईल यावर चर्चा करून घ्यावी. त्या प्रसंगी त्याचे अर्थासह सादरीकरणही करून घ्यावे.

दिवस ३९

क्षेत्र - वाचन
संकल्पना - पुस्तकातील बाल साहित्य

अध्ययन निष्पत्ती-

६ वी – वर्तमानपत्रे, मासिके व पुस्तके यातील बालसाहित्याचे समजपूर्वक वाचन करून आस्वाद घेतात संग्रह करतात.

७ वी – वर्तमानपत्रे, मासिके व पुस्तके यातील बालसाहित्याचे समजपूर्वक वाचन करून आस्वाद घेतात संग्रह करतात.

जाणून घेऊ या -

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना बालसाहित्याची पुस्तके वाचावयास द्यावीत. शाळेच्या ग्रंथालयात अशी अनेक पुस्तके असतात. त्यातील वाचलेल्या साहित्यावर मुलांना प्रश्न विचारावेत.

❖ प्रश्न

१.कवितेच्या कवयित्री कोण आहेत ?

२.कवयित्री जुईला काय सांगत आहे ?

३.झोका या अर्थाचा कवितेत कोणता शब्द आला आहे ?



सक्षम बनू या -

❖ शिक्षकांनी शाळेतील ग्रंथालय अथवा उपलब्ध बालसाहित्याचे वाचन मुलांना करायाला सांगावे. त्यावर आधारित प्रश्नमंजुषेचे आयोजन करावे.

सराव करू या -

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या कुटुंबाद्वारे, मित्रांद्वारे तसेच शाळेतील ग्रंथालयातून मिळणाऱ्या अनेक छोट्या – छोट्या बालसाहित्याच्या पुस्तकांचे वाचन करण्यास सांगावे. यासाठी शिक्षकांनी प्रोत्साहन द्यावे व वाचलेल्या पुस्तकाचे आठवड्यातून एकदा सर्वांना सारांश कथन करावयास सांगावे.

दिवस ४०

क्षेत्र - लेखन
संकल्पना - स्व- अभिव्यक्ती

अध्ययन निष्पत्ती-

६ वी - इतरांनी सांगितलेले अनुभवलेले अनुभव आवश्यकतेनुसार लिहितात. उदा. बसस्थानक, रेल्वेस्थानक इ.

७ वी - इतरांनी सांगितलेले व अनुभवलेले अनुभव आवश्यकतेनुसार लिहितात, सांगतात. उदा. बसस्थानक, रेल्वेस्थानक इत्यादी.

जाणून घेऊ या -



❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे. उदा. बागेमध्ये / उद्यानात सहलीसाठी गेल्यावर अनुभवलेले अनुभव, केलेली मौज-मजा लिहायला सांगावी.

सक्षम बनू या -

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध प्रश्न विचारून बोलण्यास प्रवृत्त करावे व आपले विचार खालील मुद्यांवर लिहिण्याचा सराव द्यावा.

❖ कोणासोबत फिरायला आवडते? का?

❖ बागेत कोणकोणते आवाज ऐकायला येतात ?

सराव करू या -

❖ सहलीला जाताना तुमच्या बरोबर लागणा-या साहित्याची यादी तयार करा.

❖ मामाच्या गावी झाडावरचे आंबे काढताना मित्राला आलेला अनुभव स्वभाषेत लिहा.

दिवस ४१

क्षेत्र - लेखन
संकल्पना - अनुभव

अध्ययन निष्पत्ती -

६ वी - इतरांनी सांगितलेले अनुभवलेले अनुभव आवश्यकतेनुसार लिहितात. उदा. बसस्थानक रेल्वेस्थानक इ.

७ वी – इतरांनी सांगितलेले व अनुभवलेले अनुभव आवश्यकतेनुसार लिहितात, सांगतात. उदा. बसस्थानक, रेल्वेस्थानक इत्यादी.

जाणून घेऊ या -



❖ शिक्षकांनी चित्राशी संबंधित प्रश्न विचारावेत. उदा. चित्रात दिसणारे खेळ कोणते आहेत? , हे खेळ तुम्ही कधी खेळला आहात का? , या खेळांबद्दल मुलांना कोणती माहिती आहे ते त्यांना लिहिण्यास सांगावे.

सक्षम बनू या -

❖ शिक्षकांनी वर्गात विविध खेळाविषयी चर्चा करावी, त्याविषयी मिळणारी माहिती लिहिण्यास सांगावे . उदा. बैठे खेळ, मैदानी खेळ इ.

सराव करू या -

❖ विद्यार्थ्यांनी आपले आई -बाबा, आजी- आजोबांशी त्यांच्या लहानपणीच्या खेळांविषयीच्या आठवणींवर गप्पा माराव्यात. त्यांना आलेले अनुभव लिहिण्याचा प्रयत्न करावा. विद्यार्थ्यांनी त्यांना आवडणाऱ्या खेळाडूबद्दल माहिती लिहावी.

दिवस ४२

क्षेत्र - भाषाभ्यास
संकल्पना - आकारविल्ह्यानुसार

अध्ययन निष्पत्ती-

६ वी - शब्दकोश आकारविल्हयानुसार पाहतात.
७ वी - शब्दकोश आकारविल्हयानुसार पाहतात.

जाणून घेऊ या -


सिंह


समई


सीताफळ


सारंगी


सौरऊर्जा

❖ वरील चित्रे विद्यार्थ्यांना दाखवून त्याखालील शब्द आहेत त्या क्रमाने शिक्षकांनी वहीत लिहायला सांगावेत.

सक्षम बनू या -


समई


सारंगी


सिंह


सीताफळ


सौरऊर्जा

❖ वरील चित्रे विद्यार्थ्यांना दाखवून त्याखालील शब्द आहेत त्या क्रमाने शिक्षकांनी वहीत लिहायला सांगावेत. आता शब्दांच्या दोन याद्यांमधील फरक शिक्षकांनी सांगावेत, जसे की पहिल्या यादीत शब्द बाराखडीतील स्वरचिन्हांप्रमाणे नाहीत तर दुसऱ्या यादीत बाराखडीतील स्वरचिन्हांप्रमाणे शब्द आहेत. यातून शिक्षकांनी शब्दकोश आकारविल्हयानुसार कसा वाचायचा व शब्द आकारविल्हयानुसार कसे लिहायचे ही संकल्पना स्पष्ट करावी.

सराव करू या -

❖ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील अ गटातील शब्द बाराखडीतील स्वरचिन्हांप्रमाणे ब गटात क्रमाने लिहिण्यास सांगावे.

अ-गट	ब – गट
जहाज, जुने, जैतापुर, जंतरमंतर, जोखड, जातककथा, जीभ, जिद्द	

दिवस ४३


क्षेत्र - भाषाभ्यास
संकल्पना - म्हणी व वाकप्रचार

अध्ययन निष्पत्ती -

६ वी - विद्यार्थी वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळ्या उद्देशांनुसार लिहिताना शब्द, वाक्य, वाक्प्रचार, म्हणी यांचा योग्य वापर करतात.

७ वी - विद्यार्थी वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळ्या उद्देशांनुसार लिहिताना शब्द, वाक्य, वाक्प्रचार, म्हणी यांचा योग्य वापर करतात.


जाणून घेऊ या -



वासरात लंगडी गाय शहाणी



स्वत:च्या पायावर धोंडा मारून घेणे



उंटावरून शेळ्या हाकणे



हातच्या कंकणाला आरसा कशाला?

❖ वरील चित्रांखालील वाक्यांमधून 'म्हण' व 'वाक्प्रचार' यातील फरक शिक्षकांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगावा .

सक्षम बनू या

अ गट (वाक्प्रचार)	ब गट (म्हणी)
१.तल्लीन होणे	नाकापेक्षा मोती जड
२.गाढ झोपणे	चोरावर मोर

शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून वरीलप्रमाणे गटांमध्ये म्हणी व वाक्प्रचार लिहून घ्यावेत.

सराव करू या -

❖ अक्षरे व शब्दांची सरमिसळ करून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वाक्प्रचार व म्हणी शोधायला सांगाव्यात जसे की,- णेहस दकनखु , बेथें चेसा ळेत बेथें.

दिवस ४४

क्षेत्र - वाचन
संकल्पना - बोलीभाषेतील बालसाहित्य

अध्ययन निष्पत्ती -

६ वी - वर्तमानपत्रे ,मासिके व पुस्तके यातील बालसाहित्याचे समजपूर्वक वाचन करून आस्वाद घेतात संग्रह करतात.

७ वी – वर्तमानपत्रे, मासिके व पुस्तके यातील बालसाहित्याचे समजपूर्वक वाचन करून आस्वाद घेतात संग्रह करतात.

जाणून घेऊ या -

❖ शिक्षकांनी त्यांच्या परिसरातील बोली भाषेतील लेखक, कवी यांचे बालसाहित्य विद्यार्थ्यांना वाचावयास सांगावे व त्यांच्या बोलीभाषेत त्यावर प्रश्न विचारावेत.

टीप- इथे साहित्य शिक्षकांनी निवडावे कारण प्रत्येक ठिकाणी त्या परिसरातील बोलीभाषा ही वेगवेगळी असेल त्यावर आधारित प्रश्न देखील वेगवेगळे असतील.

सक्षम बनू या -

❖ शिक्षकांनी प्रमाणभाषेतील साहित्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या परिसरातील, भावविश्वातील व बोलीभाषेतील साहित्य त्यांना वाचन करण्यासाठी उपलब्ध करून द्यावे. त्यातील वेगवेगळे शब्द हे प्रमाण भाषेशी समानार्थी आहेत का यावर त्यांच्याशी चर्चा घडवून आणावी तसेच बोलीभाषा व प्रमाणभाषा यात समन्वय साधून विद्यार्थ्यांकडून साहित्याच्या समजे बरोबरच शब्दांचे अर्थलेखन करून घ्यावे.

सराव करू या -

❖ शिक्षकांनी बोलीभाषेतील साहित्य, लेखक व कवी यांची पुस्तके उपलब्ध करून द्यावीत आणि विद्यार्थ्यांचा अधिकाधिक वाचन सराव व साहित्य समज वृद्धिंगत करण्यासाठी विद्यार्थ्यांचे चर्चासत्र आयोजित करून प्रोत्साहन द्यावे.

पंचेचाळीसावा दिवस

: राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे:

सेतू अभ्यास चाचणी क. ३- (दिवस एकतीस ते चव्वेचाळीस)

इयत्ता- ७ वी
गुण-३०

प्रश्न: १. खालील चित्राचे निरीक्षण करून दिलेल्या मुद्द्यांवर तुझे मत व्यक्त कर. **(गुण-५)**


(शिक्षकांनी मुलांना प्रत्येक मुद्द्यावर किमान १ मत व्यक्त करण्यास सांगावे.)



मुद्दे -
१.व्यवसाय
२. चित्रातील परिसर
३.चित्रातील संभाषण
४.चित्रातील व्यवसायाचा जिल्हा
५.या व्यवसायातून मिळालेल्या मालापासून तयार होणाऱ्या इतर वस्तू

प्रश्न: २. ऐक व लिही . (शिक्षकांनी जोडाक्षरयुक्त दोन ओळी श्रुतलेखनासाठी सांगाव्यात.) **(गुण-२)**

प्रश्न: ३. चौकटीत लिहिलेल्या शब्दाशी संबंधित शब्द लिही. **(गुण-३)**



प्रश्न: ४. अ) गलका वाढणे - (वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करून लिही.) **(गुण-१)**

ब) नदीकाठी दाट झाडी , कोणत्या झाडाला असते दाढी? (कोड्याचे उत्तर लिही.) **(गुण-१)**

प्रश्न: ५. पुढील वाक्यामध्ये विरामचिन्हांचा योग्य वापर करून वाक्य पुन्हा लिहा. **(गुण-२)**

कोण बरे अशी ही मोठी आई तिचे नाव भूमी

प्रश्न: ६ अ) लिंग बदल- बैल- **(गुण-१)**

ब) वचन बदल – बांगडी – **(गुण-१)**

प्रश्न: ७. पुढील वाक्यांचे काळ बदलून लिही. **(गुण-२)**

अ) राणी जेवत आहे. (भूतकाळ)

ब) खूप पाऊस पडेल. (वर्तमानकाळ)

प्रश्न: ८. अ) शाळेच्या आवारात लिहिलेल्या असाव्यात अशा दोन सूचना लिही. **(गुण-२)**

प्रश्न: ९. खालील परिच्छेद वाचून प्रश्नांची उत्तरे लिही.

काल सकाळी सहाच्या सुमारास मी बाबांबरोबर फिरायला गेलो होतो. पूर्वेकडून सूर्य वर येत होता. सूर्याची ती लालसर पिवळी किरणे किती वेगळी व छान दिसत होती! त्यांच्याकडे मी वारंवार पाहत होतो. सकाळचा तो गारवा किती छान वाटत होता. रस्त्यातल्या झाडांवर वेगवेगळे पक्षी बसलेले होते. त्यांचे वेगवेगळे आवाज कानांवर पडत होते. बाबा खूपच भरभर चालत होते. चालता चालता मी मात्र दमलो होतो. बाबांना मी थांबायला सांगितले. आम्ही एका ठिकाणी बसलो. बाबा सकाळच्या मोकळ्या व शुद्ध हवेविषयी मला सांगत होते. खरंच त्या शुद्ध व मोकळ्या हवेचा अनुभव मला येत होता. मला प्रसन्न व ताजेतवाने झाल्यासारखे वाटत होते. रोज सकाळी लवकर उठण्याचा आणि फिरायला जाण्याचा अनुभव तुम्हीपण घ्या. तुम्हांलाही छान वाटेल.

१. (शिक्षकांनी विद्यार्थ्याला परिच्छेदाचे प्रकट वाचन करण्यास सांगावे.) **(गुण-२)**

२. परिच्छेदात आलेले एक विशेषण लिही. **(गुण-१)**

३. तुमच्या घराजवळील असा कोणता परिसर आहे जेथे तुम्हाला शुद्ध व मोकळी हवा मिळू शकेल? **(गुण-१)**

४. थंड हवा यासाठी परिच्छेदात कोणता शब्द आला आहे? **(गुण-१)**

प्रश्न: १०. दिलेल्या चित्रावरून गोष्ट तयार करून लिही. गोष्टीला योग्य शीर्षक दे. **(गुण -५)**

(शिक्षकांनी मुलांना दिलेल्या चित्राच्या आधारे १० ओळींमध्ये गोष्ट लिहिण्यास सांगावी.)

